CMYK

सोलापूर

# तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

Solapur Tarun Bharat

छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | शुक्रवार, दि. २० मार्च २०२६ | वर्ष – ३ रे | अंक ३४० | पाने : ८ | किंमत रु. ६/– | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com



# विजय स्तंभावर गुढी उभारुन नववर्षे साजरा

**तभा वृत्तसेवा**

**पैठण, दि. १९ मार्च :** दक्षिण काशीतील पैठणमध्ये गुढीपाडवा सण तिथीनुसार सातवाहन राजांची प्रतिमेची मिरवणूक काढून उत्साही वातावरणात साजरा करण्यात आला. जुन्या पैठण मधील तीर्थ स्तंभ (विजयी स्तंभ ) उद्यानात गुढीवर पुष्पृष्टी करून सम्राट शालिवाहन राजांचा जयजयकार करून शालिवाहन शके १९४८ नववर्षाचे स्वागत करण्यात आले.

सम्राट शालिवाहन राजाची जन्मभूमी तथा कर्मभूमी पैठण होती. शालिवाहन राजाने दक्षिण भारतावर विजय मिळवल्यानंतर पैठण त्यांची राजधानी होती. सम्राट गौतमी सातकर्णी राजाने इ.स.७८ मध्ये नाशिक परिसरातील शक क्षत्रप नहपान याचा पराभव करून विजयाच्या प्रित्यर्थ शालिवाहन शके कालगणना सुरू केली. यावेळी भाजपा प्रदेश चिटणीस रेखाताई कुलकर्णी, शालिवाहन बँकेचे चेअरमन किशोर चौव्हाण विधितज्ज्ञ राजेंद्र गोर्डे, उपनगराध्यक्ष तुषार पाटील, प्रा. संतोष गव्हाणे, माजी नगराध्यक्ष शेखर पाटील,शहराध्यक्ष जितू परदेशी, व्यापारी महासंघाचे पवन लोहिया, सागर पाटील, रमेश खांडेकर, सामाजिक कार्यकर्ते दिनेश पारीख अश्र्विनी लखमले आदींची भाषणे झाली.

कार्यक्रमाचे संचालन मदन आव्हाड यांनी केले तर सतीश आहेर यांनी आभार मानले. सामूहिक पसायदानाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. यावेळी बलराम लोळगे, पवन मैंड, सूरज गोजरे,रमेश लिंबोरे बद्रीनाथ खंडागळे, संतोष गोबरे, शिवाजी गाडे, राहुल पगारे, अँड संदीप जाधव, बलभीम फलके, गणेश पवार,अँड वैभव चव्हाण, विकी खांडेकर, हर्षेवर्धन पाटील,पांडुरंग मोरे, शुभम रूपेकर, सूरज घुले, आकाश दौंड,भानू वायचळ, विवेक काळे, दक्ष खांडेकर, रुपेश चौहान,भाऊसाहेब चोरगे, निलेश परदेशी, ज्ञानेश्र्वर सपकाळ, पंढरीनाथ फुळझळके, विलास खर्डेकर, रजत परदेशी, गणेश खंडागळे, शिवाजी गोडसे, गणेश चौहान, हर्षवर्धन पाटील, केदार खंडागळे सह राजा शालिवाहन प्रेमी मोठया संख्येने उपस्थित होते.

शालिवाहन नागरी पतसंस्थेच्या कर्मचाऱ्यांनी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे आयोजन शालिवाहन शक समारोह समितीच्या वतीने करण्यात आले.



## थोडक्यात...

### चेलाराम डायबेटिस इन्स्टिट्युट तर्फे १० वी आंतरराष्ट्रीय मधुमेह परिषदसंपन्न

**छत्रपती संभाजीनगर :** चेलाराम डायबेटिस इन्स्टिट्युट तर्फे पुण्यात आयोजित १० व्या आंतरराष्ट्रीय मधुमेहपरिषद – २०२६ (इंटरनॅशनल डायबेटिस समिट) मध्ये विविध देशांतील २९०० हून अधिक डॉक्टरसहभागी झाले. या तीन दिवसीय परिषदेत मधुमेह आणि त्याच्या गुंतागुंतींबद्दलच्या उपाययोजनांवरसखोल वैज्ञानिक चर्चा करण्यात आली. या परिषदेचे उद्घाटन महाराष्ट्र वैद्यकीय परिषद, मुंबई येथील प्रशासक व केंद्र सरकारच्याआरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या राष्ट्रीय सीकल सेल निर्मूलन अभियानाचे सदस्यव थॅलेसेमिया न्ड सीकल सेल सोसायटी ऑफ इंडियाचे अध्यक्ष डॉ.विंकी रूघवानी यांच्याहस्ते करण्यात आले. यावेळी चेलाराम फाऊंडेशनचे उपाध्यक्ष प्रकाश भूपटकर, चेलराम डायबेटिसइन्स्टिट्युटचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. उन्नीकृष्णन ए.जी. आणि चेलाराम डायबेटिसइन्स्टिट्युटचे मुख्य वैद्यकीय अधिक्षक विंग कमांडर (डॉ.) हर्षल मोरे (निवृत्त)आदी मान्यवर उपस्थित होते.

### पोकोकडून पोको एक्स८ प्रो सिरीज लाँच

**छत्रपती संभाजीनगर :** पोको या भारतातील आघाडीच्या ग्राहक तंत्रज्ञान ब्रँडने आज पोको एक्स८ प्रो सिरीज लाँच केली. या सिरीजमध्ये पोको एक्स८ प्रो मॅक्स, पोको एक्स८ प्रो आणि स्पेशल एडिशन पोको एक्स८ प्रो – आयर्न मॅन एडिशनचा समावेश आहे. एक्स सिरीजच्या भावी उत्क्रांतीला सादर करत नवीन लाइनअपमध्ये प्रमुख डिवाईसेसमधील कार्यक्षमता, दीर्घकाळापर्यंत टिकणारी बॅटरी, सर्वोत्तम मनोरंजन आणि प्रीमियम डिझाइन आहे, ज्यामधून कार्यक्षमता–केंद्रित वापरकर्त्यांना सर्वांगीण अनुभव मिळतो. या सिरीजला नेक्स्ट–जनरेशन चिपसेट इनोव्हेशनची शक्ती मिळाली आहे, जी गती व कार्यक्षमतेसाठी डिझाइन करण्यात आली आहे. पोको एक्स८ प्रो मॅक्स भारतात डायमेन्सिटी ९५००एस चिपसेटची शक्ती असलेला, ३एनएम आर्किटेक्चरवर डिझाइन करण्यात आलेला आणि ३ दशलक्षहून अधिक अंतूतू स्कोअर देणारा पहिला स्मार्टफोन म्हणून पदार्पण करत आहे.

### एआय प्लस स्मार्टफोनने मुंबई इंडियन्स आणि कोलकाता नाइट रायडर्ससोबत भागीदारी केली

**नवी दिल्ली :** एआय प्लस स्मार्टफोनने आज आगामी टी२० हंगामासाठी २ आघाडीच्या संघांचे – मुंबई इंडियन्स आणि कोलकाता नाइट रायडर्सचे अधिकृत स्मार्टफोन पार्टनर म्हणून घोषणा केली. या भागीदारीमुळे एआय प्लस स्मार्टफोन भारतातील सर्वात शक्तिशाली आणि मोठ्या सांस्कृतिक व्यासपीठांपैकी एकाच्या केंद्रस्थानी आला आहे. यामुळे हा ब्रँड देशभरातील लाखो उत्कट क्रिकेट चाहत्यांशी थेट जोडला जाईल आणि त्यांना खेळाडूंना भेटण्याची संधी, सामन्याची तिकिटे, स्वाक्षरी केलेले मर्चेंडाईज आणि एआय प्लस स्मार्टफोनवर चित्रित केलेल्या खेळाडूंच्या विशेष कंटेंटमध्ये प्रवेश यांसारखे खास अनुभव मिळतील.

### सॅमसंगकडून गॅलेक्सी एम१७ई ५जी लाँच

**छत्रपती संभाजीनगर :** सॅमसंग या भारतातील सर्वात मोठ्या ग्राहक इलेक्ट्रॉनिक्स ब्रँडने आज गॅलेक्सी एम१७ई ५जी च्या लाँचची घोषणा केली. हा स्मार्टफोन विक्रीसाठी २० मार्चपासून सॅमसंग डॉट कॉम , अॅमेझॉन आणि निवडक रिटेल आऊटलेट्समध्ये उपलब्ध असेल. या स्मार्टफोनची किंमत १३,९९९ रूपयांपासून सुरू होते.गॅलेक्सी एम सिरीज सॅमसंगची सर्वात लोकप्रिय स्मार्टफोन लाइन–अप आहे आणि गॅलेक्सी एम१७ई ५जी या वारसा अधिक दृढ करतो. या स्मार्टफोनमध्ये प्रमुख स्मार्टफोन वैशिष्ट्यांमधील विश्र्वसनीय कार्यक्षमता व दैनंदिन उपयुक्ततेसह सुलभ डिस्प्ले, दीर्घकाळापर्यंत टिकणारी बॅटरी, कार्यक्षम परफॉर्मन्स, क्षमतापूर्ण कॅमेरे व इंटेलिजण्ट सॉफ्टवेअर आहे, ज्यामुळे भारतातील तरूण ग्राहकांच्या गतीशील गरजांची पूर्तता होते.

### सॅमसंग गॅलेक्सी ए५७ आणि गॅलेक्सी ए३७ लाँच करणार

**छत्रपती संभाजीनगर :** सॅमसंग भारतात आपले नेक्स्ट–जनरेशन गॅलेक्सी ए सिरीज स्मार्टफोन्स लाँच करण्यासाठी सज्ज आहे. नवीन स्मार्टफोन्स गॅलेक्सी ए ५७ ५जी आणि गॅलेक्सी ए३७ ५जी पुढील आठवड्यात लाँच होण्याची शक्यता आहे. या नवीन स्मार्टफोन्सचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे अंधुक प्रकाशात देखील सुस्पष्टपणे फोटो व व्हिडिओज कॅप्चर करण्याची कॅमेरा क्षमता असेल. या दोन स्मार्टफोन्समध्ये नवीन एआय वैशिष्ट्यांची भर होण्याची देखील शक्यता आहे, ज्याला सॅमसंग 'ऑसम इंटेलिजन्स' म्हणते.

### देवी पार्वतीच्या अटळ भक्तीने जागृत झाले भगवान महादेव

**मुंबई :** सोनी सब घेऊन आला आहे भक्ती, कुटुंब आणि दिव्य ज्ञानाच्या अमर कथा गाथा शिव परिवार की – गणेश कार्तिकेय मधून. शिव परिवाराच्या गाढ बंधनाचा उत्सव साजरा करत, शो सुंदरपणे भगवान गणेश (निर्णय समाधिया) आणि भगवान कार्तिकेय (सुभान खान) यांच्या कमी परिचित कथांना उलगडतो. भगवान शिव (अविनेश रेखी) आणि देवी पार्वती (श्रेनु पारिख) यांचे प्रिय पुत्र असलेल्या या देवतांच्या दिव्य प्रवास आजही पिढ्यांना प्रेरणा देतात. शोमध्ये आध्यात्मिक गहराई आणि कुटुंबातील भावनिक क्षणांचा सुंदर संगम दाखवला आहे, जो नातेसंबंध आणि मूल्यांना अधोरेखित करतो.

### पुष्पा इम्पॉसिबल मध्ये करुणा पांडे यांच्यासोबतच्या पुनर्मिलनाबद्दल सांगितले

सोनी सब वरील पुष्पा इम्पॉसिबल आपल्या हृदयस्पर्शी कथाकथनामुळे आणि घट्ट कौटुंबिक नात्यांमुळे प्रेक्षकांच्या मनात घर करते. या कथानकाच्या केंद्रस्थानी आहे पुष्पा (करुणा पांडे), जी आपल्या ताकदीने, ऊबदार स्वभावाने आणि चिकाटीने प्रत्येक संकटात कुटुंबाला एकत्र ठेवते. या कथेला आणखी भावनिक रंग देत आहे मुस्कान बामने, जी शानाया मेहता ही भूमिका साकारते एक हट्टी, हक्क गाजवणारी मुलगी जी पुष्पाच्या मूल्यांना आणि विश्र्वासांना सतत आव्हान देते. करुणा पांडे यांच्यासोबत पुन्हा स्क्रीन शेअर करणे मुस्कानसाठी खास अनुभव ठरला आहे.

## बहिरोबा महाराज मंदिर रस्ता कामाला सुरुवात; यात्रेपूर्वी रस्त्याचे काम पूर्ण करा – आमदार अब्दुल सत्तार यांचे निर्देश



**तभा.वृत्तसेवा**

**सोयगाव,दि.१९ मार्च :** येथील प्रसिद्ध बहिरोबा मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्याच्या कामाला अखेर गती मिळाली असून, सदर काम बहिरोबा महाराज यात्रा उत्साहपूर्वी पूर्ण करण्याचे स्पष्ट निर्देश आमदार अब्दुल सत्तार यांनी संबंधित विभागाला दिले आहेत. त्याअनुषंगाने आज या रस्ताच्या कामाला सुरुवात करण्यात आली आहे.

याप्रसंगी शिवसेना उपजिल्हाप्रमुख प्रभाकर (आबा) काळे, शहरप्रमुख तथा नगरसेवक संतोष बोडखे,न.प.तील शिवसेना गटनेता अक्षय काळे,राजू दुतोंडे, हर्षल काळे, दीपक पगारे, किशोर मापारी, कदीर शहा, भगवान जोहरे, गजानन कुडके, रमेश गव्हांडे, विजय काळे, प्रदीप चौधरी, अमोल मापारी, समाधान काळे, अतुल परदेशी, अक्षय बापू काळे आदींची उपस्थिती होती.दरम्यान यापूर्वी या रस्त्याचे काम अत्यंत संथ गतीने सुरू असल्यामुळे भाविकांना मोठ्या प्रमाणात अडचणींचा सामना करावा लागत होता.खड्डे,उखडलेला रस्ता आणि अपुरी सुविधा यामुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागत होता.याबाबत स्थानिक नागरिक आणि भाविकांकडून वारंवार तक्रारी देखील करण्यात येत होत्या. या सर्व बाबींची दखल घेत आमदार अब्दुल सत्तार यांनी संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने काम पूर्ण करण्याचे निर्देश दिले.

त्यांच्या निर्देशानंतर आता रस्त्याच्या कामाला वेग आला असून, काम युद्धपातळीवर सुरू करण्यात आले आहे. यात्रेपूर्वी हा रस्ता पूर्ण होणार असल्यामुळे भाविकांमध्ये समाधानाचे वातावरण असून, स्थानिक नागरिकांनी देखील या निर्णयाचे स्वागत केले आहे.

## नाथ आश्रम श्री क्षेत्र वेरूळ येथे संगीत नवनाथ कथेचे आयोजन भाविक भक्तांनी कथेचा लाभ घ्या – साध्वी अक्का महाराज

**तभा.वृत्तसेवा**

**खुलताबाद,दि.१९ मार्च :** श्री क्षेत्र वेरूळ तालुका खुलताबाद जिल्हा छत्रपती संभाजी नगर या ठिकाणी नाथ आश्रम प्रमुख नाथ योगिनी साध्वी अक्का महाराज यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली दि. २ एप्रिल ते ८ एप्रिल पर्यंत सायंकाळी ७ ते ९ वेळात अडबंगनाथ संस्थान भामाठाण तालुका श्रीरामपूर जिल्हा अहिल्यानगर या ठिकाणचे महाराष्ट्र भूषण महंत मठपती स्वामी अरुण नाथ गिरीजी महाराज यांच्या मधुर रसाळ वाणीतून होणार आहे या ग्रंथाचे लेखन निळकंठ तरकासे बाबुजी यांनी केले आहे या दरम्यान. (दि ३१ मार्च ते ८ एप्रिल पर्यंत गाथा पारायण ह भ प बबन महाराज केदारे. ह भ प शिवाजी महाराज मते यांच्या नियोजनात वाचन होणार आहे) तसेच या कार्यक्रमात महाराष्ट्र भूषण ह भ प नारायण महाराज बांबर्डे यांचा भारुडाचा कार्यक्रम सह विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे



या कार्यक्रमाची नाथ भक्त परिवाराच्या वतीने भव्य दिव्य असे कार्यक्रमा चे नियोजनाची तयारी पूर्ण झाली असून या कार्यक्रमात भाविकांच्या मदतीने अन्नदान. लक्ष्मी नारायण याग यज्ञ सकाळी ८ ते ५ पर्यंत. दि ६ ते ८ एप्रिल दरम्यान आचार्य श्री भाग्येश कमलाकर गुरु शिवपुरी पैठण. तरी भाविक भक्तांनी संगीत नाथ कथा व विविध धार्मिक कार्यक्रमाचे भाविक भक्तांनी जास्तीत जास्त लाभ घ्यावा असे आवाहन नाथ आश्रम प्रमुख परमपूज्य सदगुरू नाथ योगिनी साध्वी अक्का महाराज व नाथ भक्त परिवार यांच्यावतीने करण्यात आले आहे

## सुनिल काकडे यांचे निधन



**तभा.वृत्तसेवा**

**सोयगाव,दि.१९ मार्च**

येथील सुनिल तुळशीराम काकडे (वय.५६) यांचे दि.१८ बुधवार रोजी सायंकाळी अल्पशा आजाराने निधन झाले.त्यांचेवर दि.१९ गुरुवार रोजी १०:०० वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्र्चात पत्नी,एक मुलगा,दोन मुली,नातवंडे असा परिवार आहे.

## दत्तू जाधव यांचे निधन

**तभा.वृत्तसेवा**



**सोयगाव,दि.१९ मार्च :** तालुक्यातील गलवाडा (अ)येथील रहिवासी व ज्येष्ठ नाट्यकला कलावंत दत्तू धनुबा जाधव (वय ७०) यांचे दि.१६ सोमवारी वेळ १२ वाजता निधन झाले.त्यांच्या निधनाने परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. त्यांच्या पार्थिवावर सायंकाळी ६:४० वा. गलवाडा(अ) येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.जाधव यांनी अनेक वर्षे नाट्यकलेच्या माध्यमातून ग्रामीण भागात सांस्कृतिक चळवळीला हातभार लावला होता. त्यांच्या पश्चात पत्नी,एक मुलगा,दोन मुली,सून व नातवंडे असा परिवार आहे.

## भगवान महावीर जन्मकल्याण महोत्सवाची व्दितीय बैठक महावीर भवन येथे संपन्न



**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. १९ मार्च :** सकल जैन समाजाच्या वतीने भगवान महावीर जन्मकल्याणक महोत्सव दिनांक ३१ मार्च रोजी मोठया उत्साहाने साजरा करण्यात येणार असुन व्दितीय बैठकीचे आयोजन वर्धमान श्श्र्वेतांबर स्थानकवासी जैन श्रावक संघ महावीर भवन कुंभारवाडा येथे आयोजीत करण्यात आले होते. सर्व प्रथम नमोकार महामंत्राने बैठकीची सुरैवात करण्यात आली. यावेळी कार्यकमाचे सुत्रसंचालन व प्रास्ताविक प्रकाश कोचेटा यांनी केले. यावेळी जन्मकल्याणक महोत्सव समिती २०२६ च्या पदाधिका–यांचा श्रावक संघातर्फे सत्कार करण्यात आला. यावेळी सकल जैन समाजाचे महासचिव महावीर पाटणी, प्रतिक साहुजी, श्रेणीक कासलीवाल, हितेश कांकरीया, विलास साहुजी, प्रकाश कोचेटा, अनिलमामा संचेती, सविता लोढा, ललीता साकला आदींनी भगवान महावीर जन्मकल्याणक महोत्सव कशा प्रकारे साजरा करावा व भगवान महावीरांचा संदेश जिओ और जिने दो हा संदेश सर्व स्तरांतील समाज बांधवांना कशाप्रकारे पोहचेल यासाठी प्रयत्न करावे. तसेच विविध ठिकाणी सामाजिक व जनकल्याणकारी उपक्रैम राबवुन भगवान महावीर जन्मकल्याणक महोत्सव साजरा करावा. तसेच महिला समितीव्दारा विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यकमाचे आयोजन करण्यात आले असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

यावेळी झुंबरलालजी पगारीया, कोशीक सुराणा मिठालाल कांकरीया, दिलीप मुगदिया, अनिलकुमार सचेती विनोद बोकडिया, जी.एम.बोथरा, भारती बागरेचा, मनोज चोपडा, प्रविण पारख, स्वपनिल पारख राजेश मुथा, उमेश संचेती, योगेश पोरवाल, संजय संचेती, आशिष साहुजी, डॉ.शैलेश चांदीवाल, संजय गादीया, बालचंद पोकर्णा, प्रविण चोरडिया, अभय गांधी, संतोष बोहरा, हितेंद्र चोरडिया, प्रितेश बोहरा, रितेश छाजेड, रोशन छाजेड, आकाश संकलेचा, आयुष बोकडिया, आयुष बोकडिया,मधुर चोरडिया, आनंद साकला, निर्भय काठेड, नवदिप मलरेचा, विजयकुमार वायकोस, मंगल पारख, भावना सेठीया, अंजली छाजेड, ममता परमार, अर्चना साहुजी, लता क्षिरसागर, उज्वला सोनटक्के, तनुजा गांधी, आशा कासलीवाल, स्नेहा वायकोस, निता गादीया, कमलाबाई ओस्तवाल, पुष्पा बाफना, मेघा सुगंधी, सविता गोसावी, प्रिती चोरडिया, चंचलबाई जैन, संगीता संचेती, सविता लोढा, अनिता पहाडे, वैशाली धोंगडे, मनिषा भंसाली, ललीता साकला, सारीका साहुजी, मुकेश साहुजी, संतोष पापडीवाल, कौशीक सुराणा, महावीर भंसाली यांच्यासह समाज बांधवांची उपस्थिती होती.


### जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क.स्तर गंगापुर, ता. गंगापुर, जि. छत्रपती संभाजीनगर.**

दि.कि.अर्ज क्र. १६४/२०२६

अर्जदार :– १) मंदाबाई भ्र. अंबरसिंग राजपुत, वय ६३ वर्षे, धंदा घरकाम, रा. अंबेवाडी, ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर, २) जिवनसिंग पि. अंबरसिंग राजपुत, वय ३९ वर्ष, धंदा शेती, रा. वरील प्रमाणे, ३) संदीप पि. अंबरसिंग राजपुत, वय ३६ वर्ष, धंदा घरकाम, रा. वरील प्रमाणे, ४) मुन्नीबाई भ्र. जिवन दुमाले, वय ४४ वर्ष, धंदा घरकाम, रा. अमानतपुरवाडी, ता. वैजापुर, जि. छत्रपती संभाजीनगर, ५) वर्षा भ्र. सुप्पडसिंग राजपुत, वय ४४ वर्ष, धंदा घरकाम, रा. गल्लेबोरगाव, ता. खुल्ताबाद, जि. छत्रपती संभाजीनगर.

विरूध्द

गैरअर्जदार :– निरंक

प्रकरण :– हेअरशिप प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्या अर्थी अर्जदार यांनी या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळणे कामी त्यांचे विधिज्ञ अॅड. बी.आर. राजपुत यांचे मार्फत अर्ज दिला की, अर्जदार क्र. २ ते ५ हे आपसात सख्ये भाउ बहीन असुन अर्जदार क. १ ही अर्जदार क्र. २ ते ५ यांची आई आहे. अर्जदार क्र. २ ते ५ यांचे वडील व अर्जदार क्र.१ यांचे पती नामे अंबरसिंग धनसिंग ताजी (राजपुत) हे दिनांक १०/०८/२०२५ रोजी गंगापुर ता. गंगापुर येथे मयत झाले असुन त्यांचे पाठीमागे अर्जदार हे एकमेव वारस आहेत. मयत अंबरसिंग यांचे आई वडील हे फार वर्षापुर्वीच मयत झालेले आहेत. अर्जदारांना शासकीय कामाकरीता ते मयत अंबरसिंग यांचे एकमेव वारस असल्याबाबत हेअरशिप प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्या अर्थी तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तुत अर्जास कोणाचाही काहीही आक्षेप उजर असल्यास संबंधीतांनी त्यांचा आक्षेप या न्यायालयात व्यक्तीश अथवा विधीज्ञांमार्फत हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसांच्या आत नोंदवावा मुदतीनंतरचा आक्षेप विचारात घेतला जाणार नाही व अर्जदारांना नियमाप्रमाणे त्यांचे मागणीनुसार हेअरशिप प्रमाणपत्र जारी करण्यात येईल करीता हे जाहीर प्रगटन माझ्या सही व शिक्याने आज दिनांक १८/०३/२०२६ रोजी दिले.

आदेशानुसार

**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय**
**क.स्तर गंगापुर, ता. गंगापुर**



### जाहिर प्रगटन

श्री. अण्णासाहेब विठ्ठल नरोडे रा. बोलेगाव ता. गंगापुर

विषय :– जन्म व मृत्यू नोंदणी सुधारणा अधिनियम–२०२३ अर्ज ज्यानुसार, अर्जदार श्री. अण्णासाहेब विठ्ठल नरवडे रा. बोलेगाव ता. गंगापुर यांनी विनंती अर्ज सादर करून कळविले आहे की त्यांचा नातु नामे कु. आराध्या दिपक नरवडे रा. बोलेगाव ता. गंगापुर यांचादि.२७/०८/२०२५

रोजी उपजिल्हा रुग्नालय गंगापुर ता. गंगापुर येथे झाला असून सदर ठिकाणी त्याबाबतची नोंदणी केलेली नसल्यामुळे जन्म–मृत्यू नोंदणी सुधारणा अधिनियम–२०२३ अन्वये अर्ज या कार्यालयास सादर केलेला आहे.. सदर जाहिर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस सुचित करण्यात येते की श्री. अण्णासाहेब विठ्ठल नरवडे रा. बोलेगाव ता. गंगापुर त्यांचा नातु नामे कु. आराध्या दिपक नरवडे रा. बोलेगाव ता. गंगापुर यांचा दि.२७/०८/२०२५ रोजी उपजिल्हा रुग्नालय गंगापुर ता. गंगापुर असले त्याबाबत संबंधीताचे प्रमाणपत्र जारी करण्यासाठी आदेश मिळणेस विनंती केली आहे. करीता सदर प्रकरणी जर कुणाचा काही उजर /आक्षेप/हरकत असेल तर त्यांनी सदरचे जाहिर प्रगटन प्रसिध्द झालेपासून १५ दिवसाच्या आत उजर / आक्षेप/हरकत मुळ कागदपत्रासह या न्यायालयात नोंदवावा, मुदतीनंतर आलेले कोणतेही उजर आक्षेप/हरकत ग्राहय धरले जाणार नाहीत व अर्जदाराचे जन्म प्रमाणपत्राबाबत आदेश पारीत करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदर जाहिर प्रगटन माझ्या सही व शिक्यानिशी देण्यात आले.

**दिनांक: १७/०३/२०२६ स्थळ:– गंगापुर**

**तहसिलदार तथा**
**तालुका दंडाधिकारी गंगापुर.**



**THE MAHARASHTRA AGRO-INDUSTRIES DEVELOPMENT CORPORATION LIMITED, MUMBAI**

(A Govt. of Maharashtra Undertaking)

Krushiudyog Bhavan, Aarey Milk Colony, Dinkarrao Desai Marg, Goregaon (E),Mumbai - 65. Tel. 022-28719364

**E-mail -** agroenggmaidc@gmail.com

**RFP NOTICE 2025-26**

The Maharashtra Agro-Industries Development Corporation Limited (MAIDC) invites Online Request for Proposal (RFP) from eligible and qualified agencies under the Quality and Cost Based Selection (QCBS) method for implementation of the Machinery & Equipment Unique ID (ME-UID) Program.

**LAST DATE OF SUBMISSION - 20.03.2026**

Interested Bidders are requested to enroll and visit Maharashtra State E-tendering Portal – **www.mahatenders.gov.in** for details of the tender documents. Tender document can also be seen on our website **www.maidcmumbai.com**

**Sd/-**
**(Suresh Sonawane)**
**Dy.Gen.Manager (AE)**

## थोडक्यात...

### आसाम:भाजपची पहिली यादी जाहीर

**दिसपूर :** भाजपने आसाम विधानसभा निवडणुकीसाठी आपल्या उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली आहे. या यादीत ८८ उमेदवारांच्या नावांचा समावेश आहे. भाजपच्या यादीनुसार, प्रद्युत बोरदोलोई यांना दिसपूर जागेसाठी उमेदवारी देण्यात आली आहे. बोरदोलोई हे नागाव लोकसभा मतदारसंघाचे काँग्रेस खासदार होते आणि त्यांनी मंगळवारी काँग्रेस पक्षाच्या प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा दिला होता. बुधवारी बोरदोलोई यांनी भाजपमध्ये प्रवेश केला आणि आता त्यांच्या नावाचा भाजपच्या पहिल्या यादीत समावेश करण्यात आला आहे. आसामचे मुख्यमंत्री हिमंत बिस्वा सरमा राज्यातील जलुकबारी मतदारसंघातून निवडणूक लढवणार आहेत.

### पाच जणांना समन्स

**मुंबई :** 'सरके चुनर तेरी सरके' या अश्र्लील गाण्यावरून निर्माण झालेल्या वादाच्या पार्श्र्वभूमीवर राष्ट्रीय महिला आयोगाने स्वतःहून या प्रकरणाची दखल घेतली आहे. तसेच अभिनेत्री नोरा फतेही आणि संजय दत्तसह ५ जणांना समन्स बजावले आहे. आयोगाने सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'एक्स'वर पोस्ट शेअर करत ही माहिती दिली. राष्ट्रीय महिला आयोगाने अधिनियम १९९० अंतर्गत आपल्या अधिकारांचा वापर करत सरके चुनर तेरी सरके या गाण्यात अश्र्लीलता आणि अभद्रता असल्याच्या आरोपांवर आधारित माध्यमांतील बातम्यांवरून स्वतःहून (सुमोटो) कारवाई सुरू केली आहे. या प्रकरणात अभिनेत्री नोरा फतेही, अभिनेता संजय दत्त, रकीब आलम, केवीएन समूहाचे निर्माता वेंकट के. नारायण आणि दिग्दर्शक किरण कुमार यांना आयोगासमोर हजर राहण्यासाठी समन्स बजावण्यात आले आहेत.

### खरातांकडे कोट्यधीची माया

**अहिल्यानगर:** महिलांचे शोषण करणाऱ्या आणि स्वतःला ज्योतिषी म्हणवून घेणाऱ्या अशोक खरात उर्फ कॅप्टन खरात याच्या पापाचा घडा आता भरला आहे. नाशिक गुन्हे शाखेने त्याला ताब्यात घेतल्यानंतर त्याच्या अफाट संपत्तीचे एकामागून एक धक्कादायक तपशील समोर येत आहेत. विशेष म्हणजे, शिर्डीतील अत्यंत 'प्राईम लोकेशन'ला खरात आणि त्याच्या पत्नीच्या नावे कोट्यवधींचा भूखंड असल्याचे उघड झाले असून या मालमत्तेची किंमत कोट्यावधींच्या घरात आहे.

### राजा शिवाजी लवकरच पडद्यावर

**मुंबई :** अभिनेता रितेश देशमुखच्या आगामी सिनेमाची चाहते अनेक दिवसांपासून वाटत पाहत आहेत. मात्र, आता त्यांच्यासाठी खुशबर आहे. लवकरच रितेशचा 'राजा शिवाजी' हा सिनेमा प्रेक्षकांच्या भेटीला येणार असून रितेशच्या चाहत्यांची प्रतीक्षा आता संपली आहे. या सिनेमाचा फर्स्ट लुक टीझर रिलीज झाला असून स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनावरील हा सिनेमा येत्या १ मे २०२६ रोजी जगभरात प्रदर्शित होणार आहे. लवकरच प्रेक्षकांना हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांचा जीवनप्रवास एका भव्य सिनेमॅटिक अनुभवाच्या रूपात पाहता येणार आहे. रितेश देशमुख यांचे दिग्दर्शन आणि मुख्य भूमिका साकारलेल्या 'राजा शिवाजी' या सिनेमाचा फर्स्ट लुक टीझरला सध्या चित्रपटगृहात प्रेक्षकांकडून चांगलाच प्रतिसाद मिळत आहे.

### जालन्यात अवकाळी पाऊस - गारपीट

**जालना :** जालना शहरात सकाळपासूनच अवकाळीचे वातावरण दिसून येत होते. काही वेळातच आकाश ढगांनी भरून आले आणि वाऱ्याचा वेग वाढत गारांचा वर्षाव सुरू झाला. या गारपिटीमुळे नागरिकांची धावपळ उडाली असून अनेकांनी सुरक्षित ठिकाणी आश्रय घेतला. अचानक झालेल्या या बदलामुळे रस्त्यांवरील वाहतूकही काही काळ विस्कळीत झाली. दरम्यान, गारपिटीमुळे शेती पिकांचे नुकसान झाल्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.

### अमेरिकेचे बडे नेते रडारवर

**वॉशिंग्टन/तेहरान:** मध्य पूर्व आशियात युद्ध सुरु असताना आता अमेरिकेत लक्षवेधी घडामोडी सुरु आहेत. अमेरिका आणि इस्रायलनं इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला खामेनी यांच्यासह बड्या अधिकाऱ्यांना ठार मारलं. यानंतर आता इराणकडून अशाच प्रकारच्या कारवायांची तयारी सुरु असल्याच्या चर्चा सुरु झाल्या आहे. वॉशिंग्टनमधील लष्करी तळावर अमेरिकी अधिकाऱ्यांना अज्ञात ड्रोन दिसले आहेत. या भागात ट्रम्प सरकारमध्ये मंत्री असलेले मार्को रुबियो आणि पीट हेगसेथ वास्तव्यास आहेत. अमेरिकेचे बडे नेते रडारवर असल्याच्या चर्चेने युद्ध कधी संपणार ? असा प्रश्र्न सामान्यातून उपस्थित केला जात आहे.

# 'गाळमुक्त धरण-गाळयुक्त शिवार'मुळे भागली ११ हजार गावांची तहान

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची संकल्पना; ७७ लाख टँकर क्षमतेचा पाणीसाठा पुनर्संचयित, ७.७३ कोटी घनमीटर गाळ उपसा

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. १९ मार्च :** राज्यातील जलस्त्रोत पुनरुज्जीवित करण्यासाठी राबविण्यात येत असलेल्या 'गाळमुक्त धरण-गाळयुक्त शिवार २.०' अभियानाला राज्यभरात मोठा प्रतिसाद मिळत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून सुरू झालेल्या या योजनेमुळे आतापर्यंत राज्यातील ३ हजार २६८ जलसाठ्यांमधून ७.७३ कोटी घनमीटर गाळ काढण्यात आला असून, यामुळे तब्बल ७७ लाख पाण्याचे टँकर भरतील इतकी जलसाठवण क्षमता पुनर्स्थापित करण्यात यश आले आहे. विशेष म्हणजे ११ हजार ५८३ गावांतील सुमारे १ कोटी ३९ लाख नागरिकांना त्याचा लाभ झाला आहे.



या योजनेचा सर्वाधिक लाभ राज्यातील शेतीला होत आहे. उपसा केलेला सुपीक गाळ सुमारे ६९ हजार शेतकऱ्यांनी आपल्या शेतात नेला आहे. विशेष म्हणजे, लाभार्थ्यांपैकी ९१ टक्के शेतकरी हे वंचित घटकांतील आहेत. सुपीक गाळामुळे जमिनीचा पोत सुधारण्यास मदत होत असून रासायनिक खतांवरील खर्चही कमी होत असल्याचा अनुभव शेतकरी घेत आहेत.

२०२५-२६ या आर्थिक वर्षात या मोहिमेने विशेष गती घेतली आहे. चालू वर्षात १,३९८ जलसाठ्यांमधून २.६९ कोटी घनमीटर गाळ काढण्यात आला. भंडारा आणि जळगाव जिल्ह्यांत गेल्या वर्षाच्या तुलनेत कामात ३०० टक्क्यांची वाढ झाली आहे. भंडारा जिल्ह्यात ३२ लाख, तर जळगावमध्ये १६ लाख घनमीटर गाळ काढण्यास मंजुरी देण्यात आली आहे. केवळ पश्र्िचम महाराष्ट्र किंवा विदर्भच नव्हे, तर गोंदिया आणि गडचिरोलीसारख्या दुर्गम आदिवासी जिल्ह्यांतही या योजनेची अंमलबजावणी प्रभावीपणे सुरू आहे.

लोकसहभागातून जलक्रांती :

राज्यातील ४०० पेक्षा अधिक स्वयंसेवी संस्था, ग्रामपंचायती आणि स्थानिक नागरिकांच्या सक्रिय सहभागामुळे हे अभियान यशस्वी ठरत आहे. राज्यातील बहुतांश शेती पावसावर अवलंबून असल्याने भूजल पातळी वाढवण्यासाठी हा उपक्रम कणा ठरत आहे. संभाव्य 'एल-निनो'चे संकट आणि भविष्यातील पाणीटंचाई लक्षात घेता, जलसुरक्षा अधिक बळकट करण्यासाठी शासन हा उपक्रम यापुढेही जोमाने राबविणार आहे, असे जलसंधारण विभागाकडून सांगण्यात आले.

# कराचीवर नैसर्गिक संकट; वादळामुळे १९ जणांचा मृत्यू तर अनेक जखमी

कराची : पाकिस्तानची आर्थिक राजधानी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कराची शहरात मुसळधार पाऊस आणि वादळी-वाऱ्यामुळे मोठे नुकसान झाले आहे. या वादळी वाऱ्यामुळे किमान १९ जणांचा मृत्यू झाला आहे. तर डझनभर लोक जखमी झाले आहेत. पाऊस आणि वादळामुळे झालेल्या मृत्यूंनंतर शहर प्रशासनावर प्रश्र्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

बुधवारी (१८ मार्च) रात्री कराचीमध्ये जोरदार वाऱ्यांमुळे अनेक घरांची छपरे उडाली आणि भिंती कोसळल्या. अनेक ठिकाणी झाडे आणि साइनबोर्ड पडले. मुसळधार पावसामुळे शहरातील अनेक भागांमध्ये पाणी साचले आहे. अशातच पाकिस्तान हवामान विभागाने गुरुवारी आणखी पाऊस आणि जोरदार वारे वाहण्याचा इशारा दिला आहे.

काराचीचे वरिष्ठ पोलीस अधीक्षक संघार मलिक यांनी सांगितले की, वादळादरम्यान छत आणि भिंत कोसळल्याने १२ जणांचा मृत्यू झाला. ज्या ठिकाणी ही घटना घडली, तेथे लोक चहा पित बसले होते. त्यांनी सांगितले, वादळ, जोरदार वारे आणि पावसामुळे सईदाबाद परिसरातील मोचको गोठ येथेही एक इमारत कोसळली आहे.

पोलीस अधिकाऱ्यांनी सांगितले की, बचाव पथक अद्याप ढिगारा हटवण्याचे काम करत असून मलब्याखाली आणखी लोक अडकले असण्याची शक्यता आहे. कराचीचे महापौर मुर्तजा वहाब यांनी खराब हवामान लक्षात घेऊन नागरिकांनी घरातच राहावे आणि विनाकारण बाहेर पडू नये, असे आवाहन केले आहे.

# इराणकडून सौदीच्या यानबू बंदरातील समरेफ रिफायनरीवर हवाई हल्ला

## जागतिक तेल बाजारात खळबळ



तेहरान : सौदी अरेबियाच्या लाल समुद्र किनाऱ्यावर असलेल्या यानबू बंदरगाहातील सौदी अरामको आणि एक्सॉनमोबिल यांच्या संयुक्त उपक्रम 'समरेफ' रिफायनरीवर गुरुवारी (१९ मार्च) हवाई हल्ला झाला. वृत्तानुसार, या हल्ल्याचा परिणाम मर्यादित राहिला असून रिफायनरीचे कोणतेही मोठे नुकसान झालेले नाही.

हा हल्ला इराणच्या इस्लामिक रिव्होल्यूशनरी गार्ड कॉर्प्स (आयआरजीसी) ने सौदी अरेबिया, संयुक्त अरब अमिरात आणि कतारमधील अनेक ऊर्जा केंद्रे रिकामी करण्याचा इशारा दिल्यानंतर काही वेळातच झाला. या यादीत समरेफ रिफायनरीचाही समावेश होता. अमेरिका-इस्रायलने इराणच्या ऊर्जा सुविधांवर केलेल्या हल्ल्यांना प्रत्युत्तर म्हणून हा हल्ला झाल्याचे मानले जात आहे.यानबू बंदरगाह सध्या खाडी देशांमधून कच्च्या तेलाच्या निर्यातीसाठी उरलेला एकमेव प्रमुख मार्ग आहे, कारण मागील महिन्यात युद्ध सुरू झाल्यानंतर इराणने होर्मुज सामुद्रधुनी बंद केली आहे. जगातील सुमारे पाचव्या भागाच्या तेलपुरवठ्यासाठी हा अरुंद मार्ग अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. याआधी संयुक्त अरब अमिरातीतील फुजैराह बंदरही हल्ल्यांमुळे प्रभावित झाले असून त्यामुळे जागतिक ऊर्जा संकट अधिक तीव्र झाले आहे.

इराक आणि इराणसह अनेक आखाती देश मिळून जगातील सुमारे ३१ टक्के तेल आणि ८ ते १७ टक्के नैसर्गिक वायू उत्पादन करतात. कतारमधील रास लफ्फान एलएनजी प्रकल्पावर झालेल्या इराणी क्षेपणास्त्र हल्ल्यामुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याची माहिती आहे. समरेफ रिफायनरीवरील हल्ल्यामुळे तेल बाजारातील अस्थिरता आणखी वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. सौदी अरेबिया आणि प्रादेशिक देश ऊर्जा सुरक्षेला प्राधान्य देत असले तरी इराणच्या प्रत्युत्तरात्मक हल्ल्यांमुळे परिस्थिती तणावपूर्णच राहिली आहे. हल्ल्यांची मालिका सुरू राहिल्यास जागतिक तेलाच्या किमतींमध्ये आणखी वाढ होऊ शकते आणि पुरवठा व्यवस्थेवर गंभीर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

# केंद्रीय मंत्रिमंडळ विस्तारात शिवसेनेला आणखी २ मंत्रिपदे ?

## खासदार श्रीकांत शिंदे, श्रीरंग बारणे यांच्या नावाची चर्चा; 'ऑपरेशन टायगर'द्वारे खासदारांचे बळ वाढवण्याचा प्रयत्न

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. १९ मार्च :**राज्याच्या राजकारणातून एक मोठी बातमी समोर येत असून, आगामी केंद्रीय मंत्रिमंडळ फेरबदलात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेला आणखी दोन मंत्रिपदे मिळण्याची शक्यता आहे. यामध्ये प्रामुख्याने खासदार डॉ. श्रीकांत शिंदे आणि श्रीरंग बारणे यांची नावे चर्चेत असून, या संभाव्य विस्तारामुळे दिल्लीतील शिवसेनेचे वजन वाढणार असल्याचे संकेत मिळत आहेत.

अर्थसंकल्पीय अधिवेशनानंतर मोदी सरकारच्या मंत्रिमंडळात मोठ्या फेरबदलांचे वारे वाहू लागले आहेत. सध्या केंद्रीय मंत्रिमंडळात शिवसेनेकडून प्रतापराव जाधव हे राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) म्हणून कार्यरत आहेत. मात्र, आगामी राजकीय समीकरणे पाहता, शिंदेंच्या पदरात आणखी दोन मंत्रिपदे पडण्याची दाट शक्यता सूत्रांनी वर्तवली आहे.

दरम्यान, केंद्रात जास्तीत जास्त मंत्रिपदे पदरात पाडून घेण्यासाठी शिवसेनेकडून खासदारांचा आकडा वाढवण्याचे प्रयत्न सुरू आहेत. याचाच एक भाग म्हणून उबाठा गटातील काही खासदारांना आपल्याकडे वळवण्यासाठी 'ऑपरेशन टायगर' राबवले जात असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

नुकत्याच झालेल्या दिल्ली दौऱ्यात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली होती. या भेटीत मंत्रिमंडळ विस्तारासह उबाठा गटातील किती खासदार संपर्कात आहेत आणि आगामी राजकीय रणनीती काय असावी, यावर सविस्तर चर्चा झाल्याचे समजते. शिवसेनेने या संदर्भात अधिकृत प्रतिक्रिया दिलेली नसली तरी, विस्ताराच्या या हालचालींमुळे महायुतीमधील अंतर्गत समीकरणे पुन्हा एकदा चर्चेत आली आहेत.

# दिल्लीत झळकलेला महाराष्ट्राचा मानाचा चित्ररथ आता गिरगावात!

## कर्तव्यपथावर झळकलेल्या महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वैभवाचा मुंबईकरांना प्रत्यक्ष अनुभव

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. १९ मार्च :** नवी दिल्ली येथे प्रजासत्ताक दिनानिमित्त कर्तव्यपथावर पार पडलेल्या भव्य संचलनात प्रथम क्रमांक पटकाविणाऱ्या महाराष्ट्र राज्याच्या चित्ररथाचे गिरगाव, मुंबई येथे नागरिकांसाठी प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. या प्रदर्शनाच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या समृद्ध सांस्कृतिक परंपरेचे दर्शन सर्वसामान्यांना घडत असून नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

महाराष्ट्राच्या लोकसंस्कृती, संत परंपरा, कला आणि परंपरागत वैभवाचे प्रभावी दर्शन घडविणाऱ्या या चित्ररथाने राष्ट्रीय पातळीवर विशेष छाप पाडत देशभरातील प्रेक्षकांची मने जिंकली होती. विविध सांस्कृतिक घटकांचे सजीव आणि आकर्षक सादरीकरण या चित्ररथातून करण्यात आले असून, राज्याच्या वैभवशाली वारशाचे दर्शन घडविणारा हा उपक्रम ठरला आहे.

या चित्ररथाच्या साकार प्रक्रियेत विविध कलाकार, तंत्रज्ञ आणि सांस्कृतिक क्षेत्रातील जाणकारांनी योगदान दिले असून त्यांच्या सर्जनशीलतेचा उत्कृष्ट आविष्कार या माध्यमातून पाहायला मिळतो. प्रजासत्ताक दिन संचलनात मिळालेल्या यशामुळे राज्याच्या सांस्कृतिक ओळखीला राष्ट्रीय स्तरावर नवे अधोरेखन प्राप्त झाले आहे.

सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या वतीने आयोजित हा कार्यक्रम महाराष्ट्राचे सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार आणि सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडणार आहे.

गिरगाव परिसरातील या प्रदर्शनाला नागरिक, विद्यार्थी, सांस्कृतिक क्षेत्रातील अभ्यासक आणि पर्यटकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वैभवाचे दर्शन घ्यावे, असे आवाहन संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई श्रीराम पांडे यांनी केले आहे.



## अग्रलेख...

# ‘स्वीकृत’ ही सोय ठरू नये...

महाराष्ट्र विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांमध्येही ‘स्वीकृत सदस्य’ घेण्याबाबतचे सुधारणा विधेयक मंजूर करण्यात आले. या निर्णयामुळे राजकीय पक्ष व नोंदणीकृत गटांना त्यांच्या संख्याबळानुसार स्वीकृत सदस्य नेमण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सक्षमीकरणासाठी हा निर्णय स्वागतार्ह असला, तरी प्रत्यक्षात होणाऱ्या अंमलबजावणीवर त्याची खरी दिशा ठरणार आहे. एव्हाना नगरपालिका व महानगरपालिकांमध्ये राजकीय पक्ष ज्या पद्धतीने स्वीकृत सदस्यांच्या नेमणुका केल्या जातात, तशाच पद्धतीने येथेही होणार असतील तर ती केवळ राजकीय सोय ठरेल. नगरपालिका आणि महानगरपालिकांच्या धर्तीवर ग्रामीण प्रशासनातही तज्ज्ञांचा शिरकाव होईल, अशी अपेक्षा करणे रास्तच. पण स्थानिक स्वराज्य संस्थांचा आजवरचा अनुभव पाहता, ‘तज्ज्ञ’ आणि ‘अनुभवी’ या शब्दांच्या आड राजकीय कार्यकर्त्यांचे पुनर्वसन करण्यापलीकडे दुसरे काही घडण्याची शक्यता कमीच असते. राज्यसभा आणि विधान परिषदेतही काही अंशी असे लोक असावेत, अशी अपेक्षा आहेच. त्याचे काय होते, हे सर्वांना ठावूक आहे. त्यामुळे या स्तरावरील स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी हा अत्यंत चांगला निर्णय प्रत्यक्षात आणताना तो अशी परंपरा पाळणारा ठरू नये, एवढीच काय ती अपेक्षा.

भारतीय लोकशाहीच्या ७३ व्या आणि ७४ व्या घटनादुरुस्तीने स्थानिक स्वराज्य संस्थांना अत्यंत महत्त्वाचे अधिकार प्रदान केले आहेत. प्रशासनात केवळ लोकप्रतिनिधी असून चालत नाही, तर विविध विषयांतील जाणकार, कायद्याचे अभ्यासक, सनदी अधिकारी, डॉक्टर, अभियंते आणि दीर्घकाळ समाजसेवेचा अनुभव असलेले प्रतिनिधीही सभागृहात असावेत, हा स्वीकृत सदस्य नेमणुकीमागचा मूळ हेतू आहे. ज्या व्यक्ती निवडणुकांच्या रणांगणात पडू शकत नाहीत, परंतु ज्यांच्याकडे विकासाची सम्यक दृष्टी आणि प्रशासकीय समज आहे, अशांच्या ज्ञानाचा उपयोग नगरपालिका, महानगरपालिका व आता जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या विकासासाठी व्हावा, ही या तरतुदीमागची उदात्त भावना आहे. मात्र, तेथेही राजकीय पुनर्वसनालाच महत्त्व दिले गेले तर त्यातून फारसे चांगले निष्पन्न होण्याची शक्यता नाही. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियमान्वये ‘स्वीकृत सदस्य’ नेमणुकीबाबतचे नियम आखून दिलेले आहेत. महानगरपालिकेत एकूण निर्वाचित सदस्यांच्या १० टक्के किंवा जास्तीत जास्त ५ सदस्य, यापैकी जी संख्या कमी असेल तेवढे सदस्य स्वीकृत पद्धतीने घेतले जातात. नगरपालिकेतही याच निकषानुसार स्वीकृत सदस्यांची नेमणूक होते. त्यासाठी, नगरपालिका किंवा महानगरपालिकेचे माजी सदस्य राहिलेल्यांसह राज्य सरकार किंवा केंद्र सरकारच्या सेवेतील राजपत्रित अधिकारी म्हणून कामाचा अनुभव असलेले, मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी असलेले आणि किमान ५ वर्षांचा अनुभव असलेले डॉक्टर, अभियंता, वकील, सनदी लेखापाल, शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञ किंवा नोंदणीकृत स्वयंसेवी संस्थेत सामाजिक कार्याचा किमान ५ वर्षांचा अनुभव असलेल्या लोकांचा विचार केला जातो. स्वीकृत सदस्यांची निवड ही राजकीय पक्षांच्या निवडून आलेल्या सदस्य संख्येच्या प्रमाणात केली जाते हे खरेच आहे. ज्या पक्षाचे जास्त नगरसेवक, त्या पक्षाला जास्त स्वीकृत सदस्य मिळतात. इच्छुकांना विहित नमुन्यात अर्ज करावा लागतो. महानगरपालिकेचे आयुक्त किंवा मुख्याधिकारी या अर्जांची आणि अनुभवाच्या प्रमाणपत्रांची छाननी करतात. शेवटी निकष पूर्ण करणाऱ्या उमेदवारांची नावे सभेत सादर केली जातात आणि त्यानंतर त्यांची अधिकृत नियुक्ती केली जाते. त्यातही निवडणुकीत पराभूत झालेली व्यक्ती, अपवाद वगळता त्याच कार्यकाळासाठी स्वीकृत सदस्य म्हणून पात्र ठरत नाही. ज्या व्यक्तीने विहित मुदतीत निवडणूक खर्च सादर केलेला नाही, ती व्यक्तीही अपात्र ठरू शकते. तसेच सदस्याबाबत कोणत्याही प्रकारची गंभीर गुन्हेगारीची पृष्ठभूमी किंवा पालिकेची थकबाकी नसावी, असेही निकष आहेत. स्वीकृत सदस्यांना निवडून आलेल्या नगरसेवकांप्रमाणेच सर्व अधिकार असतात. परंतु, त्यांना सभागृहात मतदान तेवढे करता येत नाही. ते चर्चेत भाग घेऊ शकतात आणि आपले तांत्रिक किंवा प्रशासकीय ज्ञान प्रशासनाला देऊ शकतात.

असे सगळे नियम असले तरी दुर्दैवाने, नगरपालिका व महानगरपालिकांमधील स्वीकृत सदस्यांच्या निवडीचा इतिहास फारसा दिलासादायक नाही. नियमांना सोयीनुसार लवचीक केले जाणे हे आता साऱ्यांच्याच अंगवळणी पडले आहे. ज्या कार्यकर्त्याला निवडणुकीत उमेदवारी नाकारली जाते, त्याचवेळी त्याला ‘सांभाळून’ घेण्यासाठी स्वीकृत सदस्यपदाचा मार्गही मोकळा केला जातो. पक्षाशी, त्याहीपेक्षा संबंधित पुढाऱ्याशी निष्ठा असणे ही त्यासाठीची एकमेव पात्रता असते. अशा कार्यकर्त्यासाठी नेत्याचा ऊर भरून येतो आणि तो स्वीकृत सदस्य होतो. त्यामुळे खऱ्या तज्ज्ञ मंडळींसाठी या सभागृहाची दारे बंद झाली असतात. समाजातील झाकले माणिक सभागृहात क्वचित दिसतात. आता जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांमध्येही हेच लोण पसरण्याची शक्यता अधिक दिसते आहे. खरे तर, ग्रामीण भागात विकासकामांना वेग देण्यासाठी कृषी तज्ज्ञ, जलसंधारण तज्ज्ञ किंवा ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या अभ्यासकांची गरज जास्त आहे. मात्र, राजकीय पक्ष आपल्या मर्जीतील कार्यकर्त्यांचीच वर्णी लावणार असतील, तर या सुधारणा विधेयकाच्या मूळ उद्देश छेदला जाण्याची भीती आहे. पालिका अधिनियमानुसार, स्वीकृत सदस्यांसाठी पाच वर्षांचा प्रशासकीय अनुभव किंवा व्यावसायिक पदवीचे निकष आहेत. पण अनेकदा तशी बनावट अनुभव प्रमाणपत्रे सादर करून किंवा केवळ कागदोपत्री निकष पूर्ण करून राजकीय नियुक्ती केली जाते. समाजसेवक सभागृहात आला पाहिजे, अशी अपेक्षा आहे. पण समाजसेवकाचे प्रमाणपत्र देणाऱ्या शेकडो संस्था गल्लीबोळात आहेत. त्यामुळे मर्जीतील कार्यकर्त्याला सभागृहात स्वीकृत म्हणून पाठवणे नेत्यांसाठी सहज शक्य आहे. नगरपालिका व महानगरपालिकांचा बहुतांश अनुभव असाच काहीसा आहे. जिल्हा परिषदांच्या बाबतीत जर नियमावली कडक नसेल, तर सभागृहात होणाऱ्या चर्चांचा दर्जा अधिक उन्नत करण्यासाठीची राज्य सरकारची ही धडपड वाया जाईल. स्वीकृत सदस्याला मतदानाचा अधिकार नसला तरी, धोरणात्मक निर्णय घेताना त्याचे मत मोलाचे असते. हे सदस्य केवळ ‘होयबा’ म्हणून काम करणार असतील, पाच वर्षांत सभागृहात कधीच तोंड उघडणार नसतील, तर सरकारी तिजोरीवर त्यांच्या मानधनाचा आणि भत्त्यांचा अतिरिक्त भार कशासाठी? असा प्रश्न स्वाभाविकपणे उपस्थित होईल. निवडणूक आयोग आणि राज्य सरकारने स्थानिक स्वराज्य संस्थेतील स्वीकृत सदस्यांच्या पात्रतेसाठी केवळ ‘राजकीय पक्षाची शिफारस’ हा एकच निकष न ठेवता, त्यांच्या कार्याचे सार्वजनिक मूल्यमापन करणे आवश्यक आहे. नियुक्तीपूर्वी त्यांच्या ज्ञानाचा किंवा अनुभवाचा समाजाला काय लाभ झाला, याची माहिती सार्वजनिक होणे अपेक्षित आहे. राजकीय पक्षांनीही आता जरा आत्मपरीक्षण केले पाहिजे. केवळ सत्तेचे गणित जुळवण्यासाठी सभागृहाची प्रतिष्ठा, वादविवादाचा दर्जा घालवायचा आहे, की खऱ्या अर्थाने विकासाची दृष्टी देणारे सदस्य नेमून गावाचा कायापालट करायचा आहे, याचाही विचार कधी तरी केला गेला पाहिजे. सुधारणा विधेयक मंजूर होणे ही केवळ एका प्रक्रियेची सुरुवात आहे. त्याचे यश हे प्रशासनाच्या दृष्टीवर आणि राजकीय पक्षांच्या नैतिकतेवर अवलंबून आहे. जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांमध्ये ‘राजकीय तडजोड’ म्हणूनच स्वीकृत सदस्य घेतले जाणार असतील, तर हे विधेयक लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी नसून कार्यकर्त्यांच्या सोयीसाठी, टेंभा मिरवण्यासाठी आहे, असेच चित्र दिसेल. आयत्या पिठावर रेघोट्या ओढणाऱ्यांची संख्या कमी नाही. पण ग्रामीण महाराष्ट्राला सध्या टिवल्याबावल्या करणाऱ्यांची गरज नाही, तर जाणकार नेतृत्वाची आणि तज्ज्ञ मार्गदर्शकांची गरज आहे. तसे लोक सर्वत्र आहेत. अशांना सभागृहात आणल्याने राजकारण्यांना थोडा त्रास होणार असला तरी गाव-शहरांसाठी ते चांगलेच आहे. ही गरज ओळखून या पदांवरील नियुक्त्यांचा वापर झाला, तरच अर्थसंकल्पीय अधिवेशनातील हा एक चांगला निर्णय सार्थ ठरेल, असे वाटते. ▮

## तंत्रवेध

# उपयुक्तता आणि आव्हानांमध्ये समतोल हवा

**डॉ. दीपक शिकारपूर**

इंटरनेटच्या सुरुवातीच्या काळात माहिती शोधणे म्हणजे फक्त काही की-वर्ड टाकून वेबसाईट्सची यादी पाहणे इतकेच होते. मात्र, गेल्या काही वर्षांमध्ये इंटरनेटवरील माहितीचे प्रमाण प्रचंड वाढले आहे. अशा परिस्थितीत योग्य, अचूक आणि विश्वासार्ह माहिती शोधणे एक मोठे आव्हान बनले आहे. डिजिटल तंत्रज्ञानाने मोठ्या वेगाने साधलेली प्रगती अभूतपूर्व आहे. मार्केटिंग किंवा विपणन हे क्षेत्र या बदलांपासून अलिप्त राहू शकत नाही. पारंपरिक जाहिरातबाजीच्या युगातून बाहेर येऊन आता डेटा, अल्गोरिदम आणि कृत्रिम बुद्धिमत्ता हे व्यवसायाचे मुख्य कणा बनले आहेत. याच गरजेतून ‘आन्सर इंजिन ऑप्टिमायझेशन’ (एईओ) आणि जनरेटिव्ह इंजिन ऑप्टिमायझेशन (जेईओ) या संकल्पनांचा उगम झाला आहे. हे केवळ तांत्रिक बदल नसून ग्राहकांशी संवाद साधण्याचे एक नवीन माध्यम आहे. आता एआयच्या मदतीने लाखो ग्राहकांच्या डेटाचे विश्लेषण काही सेकंदांमध्ये केले जाते. मशीन लर्निंगच्या माध्यमातून संगणक कोणत्या ग्राहकाला कोणत्या वेळी काय पाहायला आवडेल, हे शिकतात. यामुळे जाहिरातींची अचूकता वाढली आहे.

एआयमुळे प्रत्येक ग्राहकासाठी स्वतंत्र मार्केटिंग धोरण आखणे शक्य झाले आहे. मागील खरेदीचा इतिहास, सोशल मीडियावरील वर्तन आणि आवड लक्षात घेऊन प्रत्येक व्यक्तीला वेगळी ई-मेल किंवा वेगळी ऑफर पाठवली जाते. यालाच हायपर-पर्सनलायझेशन असे म्हणतात. यामुळे ब्रँड आणि ग्राहक यांच्यात एक भावनिक नाते तयार होते. आजच्या काळात सर्च इंजिन्स केवळ शब्द शोधत नाहीत, तर वापरकर्त्याचा हेतू समजून घेण्याचा प्रयत्न करतात. आन्सर इंजिन ऑप्टिमायझेशनमध्ये वेबसाईट किंवा डिजिटल माहिती अशी तयार केली जाते की शोध इंजिन वापरकर्त्याला थेट उत्तर देऊ शकेल. परिसरात सर्वोत्तम मिसळ कुठे आहे याची माहिती हवी असेल तर पूर्वी ग्राहक गूगलवर ‘सर्वोत्तम मिसळ’ या शब्दांमध्ये शोध घ्यायचे आणि त्याला दहापेक्षा अधिक वेबसाईट्सच्या लिंक मिळत. आता हाच ग्राहक एआय चॅटबॉटला विचारतो, ‘माझ्या जवळच्या भागात आत्ता उघडी असलेली आणि पार्किंगची सोय असलेली मिसळची जागा सांग.’ त्याला लगेच उत्तर मिळते. लाईव्ह लोकेशन तंत्र वापरून तो त्या जागेचे निरीक्षण करू शकतो आणि दूरध्वनी करून टेबल आरक्षित करू शकतो. एकीकडे एआय अत्यंत उपयुक्त वाटत असताना या तंत्रज्ञानापुढे काही कायदेशीर आव्हानेही आहेत. शिक्षण, आरोग्य, बँकिंग, शेती, उद्योग, न्यायव्यवस्था अशा अनेक क्षेत्रांमध्ये एआयचा वापर होत आहे. पण फायदे वाढतात तसे कायदेशीर आणि नैतिक प्रश्नही उभे राहतात. विशेषतः कृत्रिम बुद्धिमत्तेने तयार केलेले साहित्य, बनावट चित्रे आणि आवाज तसेच निर्णयप्रक्रियेत होणारा पक्षपातीपणा या विषयांवर मोठी चर्चा सुरू आहे. कायद्याच्या दृष्टीने पाहिले तर बहुतांश देशांमध्ये बौद्धिक संपदा हक्क हा माणसाच्या सर्जनशीलतेशी जोडलेला आहे. म्हणजे एखादे पुस्तक, चित्र किंवा गाणे तयार करणारा लेखक किंवा कलाकार त्याचा मालक मानला जातो. पण ते साहित्य पूर्णपणे यंत्राने तयार केले असेल आणि त्यात मानवी सर्जनशीलतेचा थेट सहभाग नसेल, तर त्या साहित्याला हक्क मिळावा का, हा प्रश्न निर्माण होतो. यामुळे भविष्यात अनेक न्यायालयीन वाद उद्भवू शकतात.

उदाहरण देऊन सांगायचे तर एखाद्या लेखकाने कृत्रिम बुद्धिमत्तेच्या मदतीने कादंबरी लिहिली आणि ती प्रसिद्ध झाल्यानंतर असे आढळले की मदतकर्त्या कृत्रिम बुद्धिमत्ता माध्यमाने आधीच्या अनेक पुस्तकांमधील कल्पना वापरल्या आहेत, तर मग मूळ लेखकांचे हक्क भंग झाले का? कृत्रिम बुद्धिमत्ता शिकताना मोठ्या प्रमाणावर उपलब्ध साहित्याचा अभ्यास करते. त्यात कॉपीराईट असलेले साहित्यही असू शकते. त्यामुळे प्रशिक्षण प्रक्रियेबाबतही पारदर्शकता आवश्यक आहे. भविष्यात कायद्यात स्पष्ट तरतुदी करून कृत्रिम बुद्धिमत्तेने तयार केलेल्या साहित्याचे नियम ठरवावे लागतील. दुसरा गंभीर विषय म्हणजे डीपफेक. डीपफेक म्हणजे एखाद्या व्यक्तीचा चेहरा किंवा आवाज वापरून खोट्या चित्रफिती किंवा ध्वनी तयार करणे. यात एखाद्या प्रसिद्ध व्यक्तीचे किंवा सामान्य माणसाचेही चेहरे दुसऱ्या दृश्यात बसवले जातात. कधी कधी याचा वापर विनोदासाठी केला जातो, पण अनेक वेळा याचा गैरवापर होतो. खोट्या चित्रफिती पसरवून एखाद्याची बदनामी किंवा फसवणूक करणे किंवा राजकीय अस्थिरता निर्माण करणे, हे गंभीर गुन्हे आहेत.

भारतामध्ये अशा प्रकारच्या गुन्ह्यांवर माहिती तंत्रज्ञान कायदा आणि भारतीय दंड संहितेअंतर्गत कारवाई होऊ शकते. एखाद्याची बदनामी केल्यास बदनामीचे कलम लागू होते. खोटी कागदपत्रे किंवा चित्रफिती तयार करून फसवणूक केल्यास फसवणुकीचे कलम लागू होते. एखाद्याचा खाजगीपणा भंग केल्यास त्यासंबंधीचे कायदे वापरले जाऊ शकतात. एखाद्या महिलेचे बनावट अश्लील चित्र तयार करून प्रसारित केले, तर कठोर शिक्षा होऊ शकते. त्यामुळे डीपफेक हा फक्त तांत्रिक नाही, तर मानवी सन्मान आणि गोपनीयतेचा प्रश्न आहे. यामध्ये आणखी एक गुंतागुंतीचा मुद्दा म्हणजे याची जबाबदारी कोणाची? डीपफेक तयार करणाऱ्या व्यक्तीची की ते साधन उपलब्ध करून देणाऱ्या मंचाची? बहुतांश वेळा गुन्हा करणारी व्यक्ती थेट जबाबदार असते. परंतु याबाबत योग्य नियंत्रण ठेवले न गेल्यास, तक्रारींवर कारवाई न केल्यास त्यांनाही काही प्रमाणात जबाबदार धरले जाऊ शकते. त्यामुळे तंत्रज्ञान कंपन्यांनी कठोर नियम आणि तपास यंत्रणा तयार करणे गरजेचे आहे. पूर्वीचा सायबर कायदा (आयटी ॲक्ट २०००) हा त्या काळासाठी योग्य असला तरी आजच्या डिजिटल अर्थव्यवस्थेसाठी अपुरा आहे. त्यामुळे ‘सायबर कायदे २.०’ ही अद्ययावत, व्यापक आणि भविष्याभिमुख कायदेव्यवस्था आवश्यक आहे.

बदलत्या तांत्रिक वास्तवाला अनुरूप सक्षम व आधुनिक कायदेव्यवस्था घडवणे ही काळाची गरज आहे. जगातील अनेक देश कृत्रिम बुद्धिमत्ता या विषयावर वेगवेगळ्या पद्धतीने काम करत आहेत. या तंत्रज्ञानाचा वेग खूप जास्त असल्यामुळे सरकारांना नवीन कायदे आणि नियम तयार करावे लागत आहेत. काही देशांनी आधीच सविस्तर नियम जाहीर केले आहेत, तर काही देश अजूनही विचारमंथन करत आहेत. एक महत्त्वाची बाब म्हणजे आंतरराष्ट्रीय सहकार्य. कृत्रिम बुद्धिमत्ता हे सीमारेषा ओलांडणारे तंत्रज्ञान आहे. एका देशात तयार झालेली प्रणाली दुसऱ्या देशात वापरली जाऊ शकते. त्यामुळे संयुक्त मार्गदर्शक तत्त्वांची गरज आहे.

काही आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये देश एकत्र येऊन सुरक्षित आणि जबाबदार वापरासाठी तत्त्वे ठरवत आहेत. भविष्यात कृत्रिम बुद्धिमत्ता अधिक शक्तिशाली होणार आहे. ती न्यायालयीन साहाय्य, वैद्यकीय निदान, शेती नियोजन अशा महत्त्वाच्या क्षेत्रांमध्ये काम करेल. त्यामुळे तिच्यावर विश्वास ठेवण्यासाठी मजबूत कायदेशीर पाया आवश्यक आहे. त्यासाठी उत्तरदायित्व निश्चित करणे, मानवी हक्कांचे संरक्षण करणे आणि पारदर्शकता राखणे हे तीन मुख्य आधारस्तंभ असतील. ▮

(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)

## दिल्ली वार्तापत्र

# राज्यसभा निवडणूक निकालाचा अन्वयार्थ

**श्यामकांत जहागीरदार**

राज्यसभेच्या ३७ जागांसाठी नुकतीच निवडणूक झाली, खरं म्हणजे यातील २६ उमेदवार अविरोध निवडून आले. यात रालोआ आणि इंडिया आघाडीच्या प्रत्येकी १३ उमेदवारांचा समावेश होता. त्यामुळे फक्त ११ जागांसाठी निवडणूक घ्यावी लागली. प्रत्यक्षात ज्या ११ जागांसाठी निवडणूक घ्यावी लागली, त्यातील ९ जागा रालोआला तर दोन जागा विरोधी पक्षांना मिळाल्या. यात भाजपाला सर्वाधिक म्हणजे ५ तर त्याच्या मित्रपक्षांना ४ जागा मिळाल्या. काँग्रेस आणि बिजू जनता दलाला प्रत्येकी एका जागेवर समाधान मानावे लागले. ३७ पैकी २२ जागा राष्ट्रीय लोकशाही आघाडीने जिंकल्या, तर १५ जागांवर इंडिया आघाडीला समाधान मानावे लागले. रालोआच्या २२ जागांमध्ये भाजपाच्या सर्वाधिक म्हणजे १३ जागांचा समावेश आहे, भाजपाच्या मित्रपक्षांनी ९ जागा जिंकल्या. विरोधकांच्या १५ जागांत काँग्रेसच्या ६, तृणमूल काँग्रेसच्या ४ तर द्रमुकच्या ३ जागांचा समावेश आहे. शरद पवार विजयी झाल्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाला एक जागा मिळाली.

अपेक्षेप्रमाणे बिहार आणि ओडिशा या दोन राज्यात क्रॉस व्होटिंग झाली. त्याचा फायदा भाजपा आणि भाजपा समर्थित उमेदवारांना मिळाला. मागील राज्यसभा निवडणुकीत हरयाणा आणि हिमाचल प्रदेशमध्ये क्रॉस व्होटिंग झाले होते. हरयाणात यावेळीही निवडणुकीतील मतदानाच्या मुद्यावरून आरोप-प्रत्यारोप झाले. पण यानंतरही प्रत्येकी एकेक जागा जिंकण्यात भाजपा आणि काँग्रेस यशस्वी झाले. राज्यसभेच्या ७२ जागांसाठी यावर्षी तीन टप्प्यांत निवडणूक होणार आहे. पहिल्या टप्प्यात ३७ जागांसाठी निवडणूक झाली. आता उर्वरित ३५ जागांसाठी येत्या काही महिन्यांत दोन टप्प्यांत निवडणूक होणार आहे.

या निवडणुकीचे वैशिष्ट्य काय असा प्रश्न कोणी विचारला तर त्याचे उत्तर आहे, भाजपाची राज्यसभेत हळूहळू स्वबळावर बहुमताकडे वाटचाल सुरू झाली आहे. रालोआ म्हणून भाजपा आजच राज्यसभेत बहुमतात आहे, पण स्वबळावरील बहुमतासाठी भाजपाला आणखी काही महिने वाट पाहावी लागणार आहे.

राज्यसभेची सदस्यसंख्या २४५ असते, यातील २३३ सदस्य निर्वाचित असतात, तर १२ सदस्य नामनियुक्त असतात. २४५ सदस्यांच्या सभागृहांत बहुमतासाठी १२३ जागांची आवश्यकता आहे, पण भाजपाचे सध्याचे संख्याबळ १०७ आहे. त्यामुळे भाजपा आता स्वबळावरील बहुमतापासून फक्त १६ पावलं दूर आहे. गणिती भाषेत पाहिले तर या निवडणुकीमुळे रालोआचा १० जागांचा फायदा झाला, तर विरोधकांचे दहा जागांचे नुकसान. रालोआच्या जागा १२ वरून २२ झाल्या तर विरोधकांच्या २५ वरून १५ वर आल्या. निवडणुकीच्या आधी भाजपाजवळ ९ जागा होत्या, त्या १३ झाल्या, म्हणजे भाजपाचा ४ जागांचा फायदा झाला, तर काँग्रेसच्या जागा ४ वरून सहावर पोहोचल्या, म्हणजे काँग्रेसलाही दोन जागा जास्तीच्या मिळाल्या. जदयुला आपल्या दोन जागा कायम ठेवण्यात यश आले, तर राजदला आपल्या दोन्ही जागा गमवाव्या लागल्या. बिहारमध्ये भाजपाची एकही जागा नसताना दोन जागा भाजपाने जिंकल्या. तृणमूल काँग्रेस आपल्या चार जागा कायम ठेवण्यात यशस्वी ठरली, तर चार जागा असणाऱ्या द्रमुकला यावेळी फक्त ३ जागा जिंकता आल्या, म्हणजे त्यांचे एका जागेचे नुकसान झाले. तीच स्थिती शिवसेना उबाठाची झाली. या पक्षाजवळ एक जागा होती, ती शून्यावर आली. माकप आणि भारत राष्ट्र समितीलाही आपली जागा गमवावी लागली. बिजू जनता दलाजवळ दोन जागा होत्या, त्यांना एक जागा मिळाली, म्हणजे त्यांचे एका जागेचे नुकसान झाले.

महाराष्ट्रातील सातही जागांवरील उमेदवार अविरोध विजयी झाले. यात भाजपाच्या ४, शिवसेना एकनाथ शिंदे गट, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या प्रत्येकी एका उमेदवाराचा समावेश होता.

निवडणुकीच्या आधी राज्यसभेतील भाजपा सदस्यांची संख्या १०३ होती, ९ सदस्य निवृत्त झाल्यामुळे भाजपाचे संख्यबळ ९४ वर आले होते, पण यावेळी १३ जागा जिंकल्यामुळे भाजपा १०७ वर पोहोचली आहे. भाजपाची राज्यसभेतील ही सर्वांत जास्त सदस्यसंख्या आहे. २०१४ मध्ये सत्तेवर आली तेव्हा, भाजपा राज्यसभेत अल्पमतात होती. त्यामुळे अनेक विधेयके राज्यसभेत पारित करून घेण्यात भाजपाला अडचण येत होती. काही वर्षांपासून राज्यसभेत भाजपाची ताकद वाढत गेली. रालोआ तर बहुमतात आली, त्यामुळे भाजपाच्या अडचणी कमी झाल्या. राज्यसभेतही विधेयके सहजपणे पारित होऊ लागली.

राज्यसभेत रालोआ आणि इंडिया आघाडी व्यतिरिक्त या दोन्ही आघाड्यांत नसणारेही म्हणजे एकला चलो रेचा मार्ग पत्करणारे काही पक्ष आहेत. या सर्वांचे एकत्रित संख्याबळ २८ आहे. यात आम आदमी पक्षाचे (आप) १०, वायएसआर काँग्रेसचे सात, बिजू जनता दलाचे ६, भारत राष्ट्र समितीचे ३ तर बसपा आणि मिझो नॅशलन फ्रंटचा प्रत्येकी एक सदस्य आहे.

यावेळच्या राज्यसभा निवडणुकीने देशातील अनेक राजकीय पक्षांची समीकरणे बदलणार आहेत. या निवडणुकीचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन बिहारमधून राज्यसभेवर निवडून आले. राज्यसभेत आता माजी राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा आणि विद्यमान अध्यक्ष नितीन नवीन असे भाजपाचे दोन आजी-माजी अध्यक्ष जवळजवळ असतील. भाजप आणि काँग्रेस या देशातील दोन प्रमुख राष्ट्रीय पक्षांचे राष्ट्रीय अध्यक्ष राज्यसभेत आहेत. आतापर्यंत भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा राज्यसभेत सत्ता पक्षनेते होते, तर काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खडगे विरोधी पक्षनेते आहेत. नड्डांप्रमाणे भाजपाचे नवीन राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन राज्यसभेत सत्तापक्ष नेते होण्याची शक्यता नाही.

राज्यसभेत येण्यासाठी नितीशकुमार यांनी बिहारच्या मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा देण्याची तयारी केली, हे या निवडणुकीचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणावे लागेल. नितीशकुमार राज्यसभेत आल्यामुळे आता बिहारमध्ये सत्ताबदल होण्याचा आणि भाजपाच्या मुख्यमंत्र्याने शपथ घेण्याचा मार्ग प्रशस्त झाला आहे. उत्तर भारतातील बिहार हे एकमेव असे राज्य होते, ज्याठिकाणी अनेक वर्ष सत्तेत सहभागी असूनही कधी भाजपाचा मुख्यमंत्री झाला नाही. बिहारचे नितीन नवीन भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष झाल्यानंतर त्यांच्या पायगुणाने बिहारमध्ये भाजपाचा मुख्यमंत्री पदारूढ होण्याची परिस्थिती निर्माण झाली.

राज्यसभा निवडणुकीने आणखी एक बदल घडवला तो म्हणजे नितीशकुमार यांचा मुलगा निशांतकुमार यांचे राजकारणात पदार्पण झाले आणि नितीशकुमार यांचा राजकीय उत्तराधिकारी म्हणून त्यांची प्राणप्रतिष्ठा होण्याचा मार्ग मोकळा झाला. निशांतकुमार बिहारचे मुख्यमंत्री होण्याची शक्यता नसली तरी उपमुख्यमंत्री मात्र निश्चितपणे होऊ शकतात. घराणेशाहीच्या राजकारणाचा ठपका टाळण्यासाठी नितीशकुमार यांनी आतापर्यंत निशांतकुमारला राजकारणापासून दूर ठेवले होते.

या निवडणुकीने राज्यसभेतील उपाध्यक्षपदही रिकामे होणार आहे. विद्यमान उपाध्यक्ष हरिवंशनारायणसिंह यांना जदयुने उमेदवारी दिली नाही. त्यामुळे त्यांच्या जागेवर नव्या उपाध्यक्षाची निवड करावी लागणार आहे. त्यामुळे राज्यसभेला जसे नवे अध्यक्ष मिळाले, तसेच नवे उपाध्यक्षही मिळणार आहेत. त्यामुळे यावेळची राज्यसभा निवडणूक अनेक अर्थाने वेगळी आणि महत्त्वपूर्ण ठरली आहे. ▮

९८८१७१७८१७

## प्रासंगिक

### १०० वर्षांचा तरुण...

आज तरुण भारत आपल्या प्रवासाचे १०० वे वर्ष पूर्ण करत आहे. हा क्षण केवळ एका वृत्तपत्राच्या प्रकाशनाचा वर्धापनदिन नाही, तर तो एका वैचारिक परंपरेचा, निष्ठेचा आणि लाखो वाचकांच्या वर्धिष्णू होत गेल्या विश्वासाचा गौरव सोहळा आहे. आजचा हा शताब्दीपूर्ती सोहळा जरी औपचारिक असला, तरी त्याचे स्वरूप मात्र पूर्णतः पारिवारिक आहे. व्यासपीठावरील मान्यवरांपासून ते सभागृहात बसलेल्या शेवटच्या व्यक्तीपर्यंत प्रत्येक जण या परिवारात एकाच धाग्याने गुंफलेला आहे आणि तो धागा म्हणजे आपुलकी आणि राष्ट्रीयत्व.

**निष्ठेची अक्षय परंपरा :** खरे तर शतकाचा काळ हा एका दैनिकाच्या प्रकाशनासाठी फार मोठा काळ आहे. शंभर वर्षे सातत्याने समाजाचे वैचारिक पालन-पोषण करणे ही साधी गोष्ट नाही. ही एक अक्षय परंपरा आहे. ही परंपरा केवळ तरुण भारतच्या शीर्षस्थानी असणाऱ्या संपादकांनीच नव्हे, तर छपाई करणाऱ्या कामगारांपासून ते वितरण विभागातील सहकाऱ्यांपर्यंत प्रत्येकाने अत्यंत निष्ठेने आणि समर्पित भावनेने चालवली आहे. आजचा दिवस गेल्या १०० वर्षांत तरुण भारतसाठी योगदान देणाऱ्या या सर्वांच्या कृतज्ञ स्मरणाचा आहे. आणि आज हा वारसा समर्थपणे पुढे नेणाऱ्या, नव्हे त्याचा अधिक विस्तार करणाऱ्या नव्या दमाच्या टीमचे अभिनंदन करण्याचा हा दिवस आहे.

**वाचक : परिवाराचा आधारस्तंभ :** तरुण भारत आणि वाचक यांच्या बाबतीत असणारे नात्याचे हे गणित वेगळे आहे. इथला वाचक या दैनिकाला आपल्या कुटुंबाचा अविभाज्य भाग मानतो. सकाळी चहाचा कप हातात घेतल्यावर तरुण भारत समोर नसेल, तर अस्वस्थ होणारा आणि येरझारा घालत अंकाची वाट पाहणारा वाचक, हीच या वृत्तपत्राची खरी शक्ती आहे, ऊर्जा आहे. या वाचकांच्या भरवशावरच तरुण भारताचा गेल्या शतकाचा खडतर पण गौरवशाली प्रवास यशस्वी झाला आहे. गेली १०० वर्षे तरुण भारत आणि वाचक यांच्यातील हा स्नेहबंध अतूट राहिला आहे.

**नात्यातील वैदर्भीय ओलावा :** कुटुंब म्हटले की कुटुंबातील सदस्यांप्रति प्रेम-जिव्हाळा असतोच. आणि कधी कधी थोडा रुसवा-फुगवा सुद्धा असतो. तरुण भारताच्या वाचकांचेही तसेच आहे. कधीकधी वाचकांकडून केल्या जाणाऱ्या तक्रारीत टोकाचा राग, द्वेष-त्वेष किंवा तिरस्कार नसतो, तर ती आपुलकीची कळकळ असते. आपल्या कुटुंबातील सदस्याबद्दल कुणी उणेदुणे बोललेले आपल्याला खपत नाही, तशीच भावना वाचकांची असते. त्यामुळे कुणी नावं ठेवावीत असे काही घडू नये या काळजीपोटी केलेली ती प्रेमळ तक्रार असते. त्यांच्या या तक्रारीत एक प्रकारचा वैदर्भीय रोखठोकपणा असतो. पण हा आपुलकी आणि आत्मीयतेपोटी कळकळीने येणारा उमाळा असतो. जो केवळ प्रेमापोटीच जन्माला येतो.

**नव्या क्षितिजाकडे वाटचाल :** आपल्या परिवारातील तरुणाकडून आपल्या काही अपेक्षा असतात. त्याने आपल्याजवळ राहावे, आपल्याला प्राधान्य द्यावे, आपली काळजी घ्यावी, आपल्या कामासाठी त्याची प्राथमिकता असावी अशी आपली अपेक्षा असते. तशीच अपेक्षा आपल्या तरुण भारताकडून मायबाप वाचकांची असते. ती अगदीच चुकीची आहे असे म्हणता येणार नाही.

पण जेव्हा कुटुंबातील त्या तरुणाच्या भविष्याचा विषय येतो, त्याच्या कार्य विस्ताराचा विषय येतो तेव्हा त्याच्या प्रगतीच्या आड कुटुंब येत नाही. त्याला अतिशय आनंदाने परगावी जाण्यास अनुमती मिळते. ‘‘आम्ही इथे व्यवस्थित सांभाळून घेऊ, तू निश्चिंतपणे जग जिंकण्यासाठी बाहेर पड’’ अशी विश्वासाची शिदोरी त्याला हेच कुटुंब देत असतं. आज जेव्हा १०० वर्षांचा ‘तरुण’ असलेल्या तरुण भारताचा पुण्यात कार्यविस्तार होतो आहे. तेव्हा ...तसाच विश्वास, तशीच शिदोरी गेली १०० वर्ष काळजी वाहणारे नागपूरकर वाचक तरुण भारतला देत आहेत. शंभर वर्षांचे अनुभव पाठीशी आणि तरुणाचा उत्साह उराशी बाळगून तरुण भारत आज नव्या युगात पाऊल टाकत आहे. तरुण भारताचा वाचकां सोबतचा हा स्नेहबंध असाच अतूट राहो, हीच सदिच्छा!

**प्रसाद दत्तात्रेय पोफळी**/९८२२५६९६४८

### शतायु तरुण भारत

राष्ट्रीय नेतृत्व करणारा दैनिक तरुण भारत आज शतायु होत असल्याचा मला आनंद आहे. विद्यार्थिदशेत ‘वर्तमानपत्रे’ हा पाठ दिवंगत संपादक ग. त्र्यं. माडखोलकर माझ्या मनावर कायम स्मृतिमान बनल्याने तरुण भारताचा मी आजन्म वाचक बनलो. याच दरम्यान मा. गो. वैद्य यांचे पत्र मजकडे उपलब्ध असणे आणि गजानन निमदेव यांच्याशी आताही संवाद असणे हा तरुण भारताचा सामान्याच्या प्रति असलेला स्नेहभाव आणि राष्ट्रीय सद्भावाची जोपासना सिद्ध करणारी कर्तव्यतत्परता होय. तरुण भारताच्या मुखपृष्ठावर ‘न मे कर्मफले स्पृहा’ हे ब्रीद वाक्य राष्ट्राप्रति समर्पणाची आणि त्यागाची मूर्तिमंत सिंहगर्जना! हाच वारसा वर्तमान संपादक शैलेंद्र पांडे समर्थपणे चालवीत आहेत. तरुण भारतच्या पुढील यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छा. ▮

**वि. ल. उईके**/८२७५५२८०१६

### शालिवाहन शके १९४८ (२०२६-२७) - गुढीपाडवा

या वर्षी नवीन शालिवाहन शक १९४८ ‘पराभव’ नामक संवत्सराचा आरंभ फाल्गुन कृ. ३० सह चैत्र शु. १ गुरुवारी सकाळी ६ वा. ५३ मि. नंतर होत आहे. प्रतिपदा क्षयतिथी असल्याने नूतन वर्षारंभ, गुढीपाडवा गुरुवार १९ मार्च २०२६ रोजीच होईल. या दिवशी सकाळी ६ वा ५३ मि. नी. गुढी उभारावी. गुढीचे पूजन करून प्रार्थना करावी. गुढी पूजनाचे वेळी पुढील मंत्राने प्रार्थना करावी ‘‘ब्रह्मध्वज नमस्तेतु सर्वाऽभिष्ट फलप्रद। प्राप्तेऽस्मिन्वत्सरे नित्यं मद्गृहे मंगलं कुरु ।’’ नवीन पंचांग व त्यावरील गणपतीचे पूजन करावे, संवत्सर फल वाचावे. गुढीपाडवा हा साडेतीन स्वयं सिद्ध मुहूर्तातील एक पूर्ण मुहूर्त आहे. आपणा सर्वांना शके १९४८ पराभव नाम संवत्सर सुखसमृद्धीचे व भरभराटीचे जावो ही ईश्वर चरणी प्रार्थना.

या चैत्र शुक्ल प्रतिपदेला शालिवाहन शक १९४८ पराभव नामक सुरू होत आहे. या पराभव नामक संवत्सरात राजपद गुरूकडे, मंत्रिपद मंगळाकडे, मेघांचे आधिपत्य चंद्राकडे, अग्रधान्याचा (खरीप पिकांचा) स्वामी गुरू, रसपदार्थांचा स्वामी शनि, रबीच्या पिकांचा स्वामी बुध आहे. मध्यधान्याचा अधिपति बुध आहे. या पराभव नाम संवत्सरात पाऊस थोडा मध्यम, परंतु पिके चांगली येतील. देशविदेशात युद्धाचे वातावरण राहील. रोगराई वाढेल. राजपद गुरू या शुभ ग्रहाकडे असल्याने त्याच्या अंमलाखालील गुजरात, विदर्भ भागात पाऊस योग्य प्रमाणात पडेल. फळे व धान्याचे उत्पादन चांगले होईल. समाजात यज्ञयाग इ. धार्मिक कृत्ये होतील. रोगराई प्रमाण कमी राहील.

मंत्रिपद मंगळाकडे असल्याने धान्याची महागाई, आग, चोर यापासून नुकसान व युद्धजन्य परिस्थिती राहील. मेघांचा अधिपति चंद्र असल्याने ऊस, धान्य, फुले, दुधदुभते चांगले भरपूर येतील. नद्या, विहिरी, तळी यात भरपूर पाणी राहील. विद्वानांचा गौरव होईल. अग्रधान्याचा (खरीप पिकांचा) स्वामी गुरू आहे. त्यामुळे पृथ्वीवर पाऊस पाणी चांगले, धान्य व फळांचे उत्पादनही चांगले होईल. जनता आनंदित राहील. रसपदार्थांचा स्वामी शनि असल्याने लोकर, नीळ, लोखंड यांच्या किमती थोड्या कमी होतील. सोने, चांदी, पारा महाग होईल. रब्बीच्या पिकांचे आधिपत्य बुधाकडे आहे. त्यायोगे गहू, तांदूळ, मूग, ऊस यांचे उत्पादन चांगले, दुधदुभते भरपूर होईल. जनतेची शास्त्र अभ्यासाकडे प्रवृत्ती वाढेल. मध्यधान्याचा अधिपती बुधच असल्याने पाऊसपाणी मध्यम, तांबड्या काळ्या जमिनीत चांगली पिके येतील.

यावर्षी निज ज्येष्ठ शुक्ल अष्टमी सोमवार, हस्त नक्षत्र, वरियान् योग, बव करणावर सूर्योदयापासून दुपारी १२ वा. २३ मि. नी. सूर्य आर्द्रा नक्षत्रात प्रवेश करतो. त्यायोगे धान्य व वस्त्रे यांची थोडी वृद्धी होईल, सर्व वस्तूंची सुबत्ता राहील. जनतेला धनधान्य भरपूर मिळून जनता सुखी राहील. या वर्षात काल नावाचा मेघ वृष्टी करणार आहे व तक्षक नावाचा नाग पृथ्वी धारण करणार आहे. त्यायोगे देशविदेशात युद्धजन्य परिस्थिती राहील. या वर्षात रोहिणी नक्षत्र समुद्रावर पडले आहे. ते पर्जन्यवृष्टी चांगली होऊन सर्व धान्ये भरपूर येतील असे दर्शविते. हे शुभकारक वर्षफल गुढीपाडव्याचे दिवशी श्रवण केल्याने लक्ष्मीची व आयुष्याची वृद्धी होऊन नवीन वर्ष सुखसमाधानाचे जाते.

**ज्यो. विद्या राजंदेकर**/नागपूर

## वाचक पत्रे

### तोच खरा हिंदू अपुला

चैत्र प्रतिपदेच्या नववर्षाला
स्पर्श तो झाला सोनेरी पहाटच्या सूर्यकिरणाला...
श्रीप्रभू रामाच्या चरणी जो नतमस्तक राहिला...
तोच खरा हिंदू अपुला


बलिदानाला न घाबरता
राष्ट्रहिताची तळमळ ज्याला...
मातृभूमीचा सच्चा रखवाला...
तोच खरा हिंदू अपुला

मातृत्वाच्या त्या ऋणाला
न विसरता जो राहिला...
मुली, भगिनींच्या अब्रूचा खरा रखवाला...
तोच खरा हिंदू अपुला

कर्तृत्वाची जाणीव ज्याला
संस्कृतीची ओळख त्याला...
‘‘वसुधैव कुटुंबकम्’’ला प्राधान्य ज्याला...
तोच खरा हिंदू अपुला

‘‘सर्वे भवन्तु सुखिन’’चा मंत्र जो जपला
‘‘अतिथी देवो भव’’ सदैव वदला...
अभिमानाने उभा राहिला...
तोच खरा हिंदू अपुला

गुढी उभारून नव वर्षाला
जतन करूया अपुल्या संस्काराला...
नमन करूया भूमातेला...
तोच खरा हिंदू अपुला



**आनंद पाठक**/९९७०६००१२३ ▮

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

धाराशिव
दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## पाणीटंचाई व स्वच्छतेच्या समस्यांवरून आंदोलनाची हाक

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१९ मार्च -**

शहरातील विविध भागांमध्ये सध्या तीव्र पाणीटंचाई जाणवत असून नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. काही भागांमध्ये दूषित पाणीपुरवठा होत असल्याच्या तक्रारीही समोर येत आहेत. अशी माहिती नगरसेवक अमोल कुतवळ यांनी पत्रकार परिषदेत दिली.

या संदर्भात नागरिकांनी वारंवार तक्रारी करूनही प्रशासनाकडून ठोस उपाययोजना करण्यात आलेल्या नसल्याने नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. पाणीपुरवठा सुरळीत करणे, स्वच्छता राखणे तसेच दूषित पाण्याच्या समस्येवर तात्काळ तोडगा काढावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

दरम्यान, या सर्व प्रश्नांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी येत्या २० मार्च रोजी सकाळी १०:३० वाजता तुळजापूर नगरपरिषद कार्यालयासमोर आंदोलन करण्यात येणार आहे. या आंदोलनात विरोधी नगरसेवक तसेच महाविकास आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी होणार आहेत.

यासंदर्भात नगरसेवक अमोल कुतवळ यांनी पत्रकार परिषद घेतली. यावेळी नगरसेवक आनंद जगताप व रणजित इंगळे उपस्थित होते.



## संक्षिप्त वृत्त...



### गांजा वडगाव येथे श्री रामलिंगेश्वर यात्रेला प्रतिसाद

**लोहारा, दि.१९ मार्च -**

लोहारा तालुक्यातील गांजा वडगाव येथे ग्रामदैवत श्री रामलिंगेश्वर देवाची १३४ वर्षांची परंपरा असलेली यात्रा धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांत उत्साहात पार पडली. यात्रेनिमित्त ज्ञानेश्वरी पारायण, महाअभिषेक व टाळ-मृदंगाच्या गजरात पालखी सोहळा पार पडला. कुस्त्यांचे जंगी मैदान हे यात्रेचे मुख्य आकर्षण ठरले. स्व. बाबुराव पाटील स्मरणार्थ झालेल्या मानाच्या कुस्तीत विजेत्याला ११ हजार रुपये व चांदीची गदा देऊन सन्मानित करण्यात आले. यात्रेसाठी विद्यासागर पाटील यांनी मंडप उभारला असून, स्थानिक पदाधिकाऱ्यांनी आयोजनासाठी विशेष परिश्रम घेतले. या सोहळ्याला हजारो भाविक व कुस्तीप्रेमी उपस्थित होते.

### धाराशिव जिल्ह्यात गुढीपाडवा उत्साहात साजरा

**धाराशिव, दि.१९ मार्च -**

हिंदू नववर्षाचा प्रारंभ दर्शविणारा गुढीपाडवा सण



जिल्ह्यात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. सकाळपासूनच घराघरांवर आकर्षक गुढ्या उभारण्यात आल्या असून महिलांनी सुंदर रांगोळ्या काढून सणाचे स्वागत केले. नागरिकांनी पारंपरिक वेशभूषा परिधान करून एकमेकांना शुभेच्छा दिल्या. मंदिरे व सार्वजनिक ठिकाणी धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. सर्वत्र आनंद व उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले.

# आई राजा उदो उदो'च्या जयघोषात नववर्षाचे स्वागत!

**तुळजाभवानी मंदिर शिखरावर उभारली गुढी... दर्शनासाठी मंदिरात भाविकांची गर्दी...**

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१९ मार्च -**

महाराष्ट्राची कुलस्वामिनी, आई तुळजाभवानीच्या दरबारात हजारो भक्तांच्या साक्षीनं चैत्र शुद्ध प्रतिपदेचा उत्साह आज ओसंडून वाहत होता. साडेतीन मुहूर्तांपैकी एक असलेल्या गुढीपाडव्यानिमित्त तुळजापुरात भक्ती आणि चैतन्याचा अपूर्व संगम पाहायला मिळाला.



पहाटे ४ वाजता आईचे 'चरणतीर्थ' आणि भक्तिमय वातावरणात 'महाआरती' संपन्न झाली. शिखरावर मोठ्या डौलाने दिमाखात उभारलेल्या गुढीचे हजारो भाविकांनी मनोभावे दर्शन घेतले. परंपरेनुसार मंदिर संस्थानचे पुजारी व मुख्य महंत तुकोजी बुआ व महंत वाकोजी बुआ यांच्या हस्ते मंदिराच्या शिखरावर निळ्या रंगाच्या साडीची आकर्षक गुढी उभारून मराठी नववर्षाचे मोठ्या भक्तिमय वातावरणात स्वागत करण्यात आले.

कुलस्वामिनी तुळजाभवानी आईला आज साखरेचा हार आणि विशेष शिवकालीन अलंकार, महावस्त्र परिधान करण्यात आले होते. देशभरातून आलेल्या हजारो भाविकांनी केलेल्या 'आई राजा उदो उदो'च्या जयघोषाने अवघा मंदिर परिसर दुमदुमून गेला होता. मराठी नववर्षाच्या स्वागताला तुळजापूरनगरीमध्ये देवी भक्तांनी मोठ्या सहकुटुंब दर्शनार्थ गर्दी केली.

साखरेच्या हाराचा गोडवा आणि कडुनिंबाचे आरोग्य घेऊन आलेले हे नवीन वर्ष आपणा सर्वांना सुख, समृद्धी आणि आरोग्याचे जावो, हीच आई तुळजाभवानी मातेच्या चरणी प्रार्थना करण्यात आली.



# धाराशिव येथे राज्यस्तरीय गंगाधर करंडक एकांकिका व नृत्य स्पर्धेचे आयोजन

**गंगाधर करंडक एकांकिका स्पर्धेच्या लोगोचे अनावरण : यंदा या उपक्रमाचे सातवे वर्ष...**






**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१९ मार्च -**

अखिल भारतीय नाट्य परिषदेच्या धाराशिव शाखेच्या वतीने सांस्कृतिक सप्ताहाचे आयोजन करण्यात आले असून यंदा या उपक्रमाचे सातवे वर्ष साजरे होत असून या स्पर्धेसाठी राज्यभरातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असल्याची माहिती धाराशिव शाखा अध्यक्ष तथा संयोजक विशाल शिंगाडे यांनी पत्रकार परिषदेत दिली

या सांस्कृतिक सप्ताहाअंतर्गत गंगाधर करंडक राज्यस्तरीय मराठी एकांकिका स्पर्धा २७, २८ आणि २९ मार्च रोजी आयोजित करण्यात आली आहे. त्यानंतर ३० व ३१ मार्च रोजी भव्य नृत्य स्पर्धा होणार असून १ एप्रिल रोजी भव्य कलावंत मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या सर्व कार्यक्रमांचे आयोजन धाराशिव शहरातील छत्रपती शिवाजी महाराज नाट्यगृहात करण्यात आले आहे.

या प्रसंगी गंगाधर करंडक एकांकिका स्पर्धेच्या लोगोचे अनावरण करण्यात आले. तसेच या स्पर्धेदरम्यान मराठी चित्रपटसृष्टीतील नामांकित कलाकार व नाट्यकर्मी उपस्थित राहणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.

स्पर्धेतील विजेत्यांसाठी आकर्षक पारितोषिकांची घोषणा करण्यात आली आहे. प्रथम पारितोषिक रुपये ५१,९९०, द्वितीय पारितोषिक रुपये ३१,०००, तृतीय पारितोषिक रुपये २१,०००, चतुर्थ पारितोषिक रुपये ११,००० तर उत्तेजनार्थ पारितोषिक रुपये ५,००० असे ठेवण्यात आले आहे. याशिवाय विविध वैयक्तिक पारितोषिकेही मोठ्या प्रमाणात दिली जाणार आहेत.

स्पर्धेसाठी इच्छुक स्पर्धकांनी व एकांकिका विभाग प्रमुखांनी आयोजन शाखेशी संपर्क साधून आपल्या प्रवेशिका निश्चित करण्याचे आवाहन संयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

या पत्रकार परिषदेला धाराशिव शाखा अध्यक्ष विशाल शिंगाडे, शेषनाथ वाघ, धनंजय कुलकर्णी, सुगत सोनवणे, शुभम खोत, विजय उंबरे, सुहास झेंडे, सुरेश देवकुळे, आलम बेग, सत्यजित माने आणि यशवंत शिंगाडे उपस्थित होते.

## धाराशिव तालुक्यात अवकाळी पावसाची हजेरी; शेतकऱ्यांची चिंता वाढली

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१९ मार्च -**

तालुक्यातील धाराशिव येथे गुरुवारी दुपारनंतर अवकाळी पावसाने अचानक हजेरी लावली. विशेषतः ढोकी आणि येडशी परिसरात जोरदार सरी कोसळल्या. सकाळपासून वातावरण ढगाळ होते, मात्र दुपारी वाऱ्यासह पावसाने जोर पकडला.

या अनपेक्षित पावसामुळे रब्बी हंगामातील पिकांवर परिणाम होण्याची भीती शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे. विशेषतः गहू, हरभरा आणि भाजीपाला पिकांना फटका बसण्याची शक्यता आहे. काही ठिकाणी वाऱ्यामुळे झाडे वाकली तसेच काढणीस तयार असलेले पीक आडवे पडल्याचेही दिसून आले. नुकसान झालेल्या पीकांचे व फळबागेचे तात्काळ पंचनामे करण्याची मागणी शेतकरी करीत आहेत. दरम्यान, हवामान खात्याने पुढील काही दिवस ढगाळ वातावरण राहण्याचा अंदाज व्यक्त केला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी आवश्यक ती काळजी घेण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# धनंजय सावंत यांच्या गाडीचा अपघात



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१९ मार्च -**

जिल्हा परिषद सदस्य धनंजय सावंत यांच्या गाडीचा अपघात झाला असुन त्यात ते सुखरूप बचावले. गुरुवारी मध्यरात्री १ च्या सुमारास सोलापूर पुणे महामार्गावर बारामतीजवळ धनंजय सावंत यांच्या फॉर्म्युनर कारचा भीषण अपघात झाला.

यात कंटेनरने दिलेल्या धडकेत कारचे मोठे नुकसान झाले. यात सावंत यांना कोणतीही जखम झाली नाही, सुरक्षा रक्षक व चालक यांना किरकोळ जखम झाली. त्यांना तातडीने जवळच्या रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.

धनंजय सावंत हे बुधवारी मुंबईत भाजपमध्ये अधिकृत पक्षप्रवेशाचा मोठा सोहळा आटोपून आपल्या फॉनर (एमएच १२ सीई ५५५९) गाडीने परंड्याकडे येत होते. भिगवणजवळील डाळज २ गावाच्या हद्दीत आले असता, समोरून येणाऱ्या कंटेनरने (एमएच १२ डब्लुजे ६३७४) त्यांच्या वाहनाला भीषण धडक दिली.

कार्यकर्त्यांचे प्रेम, शुभेच्छा आणि ईश्वराची कृपा यामुळेच मी या भीषण अपघातातून सुखरूप बाहेर आलो आहे. थोड्या किरकोळ जखमा झाल्या असल्या तरी प्रकृती स्थिर आहे, कुणीही काळजी करू नये, अशी प्रतिक्रिया धनंजय सावंत यांनी दिली.

## धाराशिवात उद्योजक मेळाव्यात नवउद्योजकांना मार्गदर्शन

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१९ मार्च -**

जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, धाराशिव, दे आसरा फाउंडेशन, पुणे तसेच व्यवस्थापन शास्त्र विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ उपपरिसर, धाराशिव यांच्या संयुक्त विद्यमाने एमआयडीसी येथील विद्यापीठाच्या ऑडिटोरियम हॉलमध्ये उद्योजक मेळावा उत्साहात पार पडला.

मेळाव्यात नवउद्योजकांना उद्योग उभारणीसंदर्भातील विविध बाबींवर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमाचे उद्घाटन जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक अमोल बळे यांच्या हस्ते झाले. यावेळी एमआयडीसीचे क्षेत्रीय व्यवस्थापक डी.व्ही. खाडे, जिल्हा माहिती अधिकारी विवेक खडसे तसेच दे आसरा फाउंडेशनच्या सायली जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती. उद्घाटन प्रसंगी अमोल बळे यांनी वाढत्या लोकसंख्येमुळे नोकरीच्या संधी कमी होत असल्याचे सांगून उद्योगाशिवाय पर्याय नसल्याचे नमूद केले. कौशल्य, आर्थिक पाठबळ, शासकीय मदत आणि प्रभावी मार्केटिंग या चार घटकांवर शासन उद्योजकांना सहाय्य करत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत जिल्ह्यात ८०० हून अधिक उद्योगांना मदत करण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली. विवेक खडसे यांनी धाराशिव हा आकांक्षित जिल्हा असून शेतीपूरक उद्योगांची गरज अधोरेखित केली. अशा उद्योगांमुळे रोजगारनिर्मिती होऊन नागरिकांचे जीवनमान उंचावेल, असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक सहाय्यक आयुक्त संजय गुरव यांनी केले, तर आभार प्रदर्शन सुयोग अमृतराव यांनी केले. कार्यक्रमास मोठ्या संख्येने उद्योजक उपस्थित होते.

## सायबर पोलिसांची तत्परता; चुकीने गेलेले १.५४ लाख रुपये परत

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१९ मार्च -**

चुकीच्या स्कॅनरवर पैसे पाठवल्याने फसवणूक झालेल्या महिलेचे १ लाख ५४ हजार रुपये सायबर पोलिसांच्या तत्पर कारवाईमुळे परत मिळाले आहेत.

पूनम दिपक दंडनाईक (रा. किणी, ता. जि. धाराशिव) यांनी ५ डिसेंबर २०२५ रोजी आडत बाजारात सोयाबीन विक्रीनंतर पैसे पाठवताना चुकून रक्कम अज्ञात स्कॅनरवर पाठवली होती. संबंधित व्यक्तीने पैसे परत देण्यास नकार दिल्याने त्यांनी तत्काळ एनसीसीआर पोर्टल व हेल्पलाईन क्रमांक १९३० वर तक्रार नोंदवली. सायबर पोलीस ठाण्याने तक्रारीच्या आधारे बँकेशी पत्रव्यवहार करून संबंधित खात्याची माहिती मिळवली व तातडीने ती रक्कम 'फ्रीज' करण्यात आली. पुढे न्यायालयीन आदेश मिळवून बँकेमार्फत दि. १७ मार्च २०२६ रोजी पूर्ण १,५४,००० रुपये तक्रारदारांना परत मिळाले. कारवाईबद्दल तक्रारदारांनी सायबर पोलिसांचे आभार मानले. ही कारवाई पोलीस अधीक्षक रितु खोखर व अपर पोलीस अधीक्षक शफकत आमना यांच्या मार्गदर्शनाखाली पोनि शकील शेख व पथकाने केली.

दरम्यान, ऑनलाइन फसवणूक झाल्यास नागरिकांनी तात्काळ १९३० या हेल्पलाईनवर किंवा एनसीसीआर पोर्टलवर तक्रार नोंदवावी, असे आवाहन पोलीस दलाने केले आहे.

# तेरखेडा येथे रक्तदान शिबिर; २०० रक्तदात्यांचा सहभाग

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.१९ मार्च -**

वाशी तालुक्यातील तेरखेडा येथे राज्याचे माजी आरोग्यमंत्री तथा परंडा मतदारसंघाचे आमदार तानाजीराव सावंत यांच्या वाढदिवसानिमित्त हनुमान मंदिरात भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या सामाजिक उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.



या शिबिरात २०० हून अधिक नागरिकांनी रक्तदान करून सहभाग नोंदवला. विशेष म्हणजे शेतकरी, युवक आणि महिलांनीही मोठ्या उत्साहाने रक्तदान करत समाजाप्रती आपली जबाबदारी पार पाडली. रक्तदानासारख्या उपक्रमातून गरजू रुग्णांना मोठा दिलासा मिळणार असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

संकलित रक्त सोलापूर जिल्ह्यातील बार्शी येथील भगवंत रक्तपेढी तसेच धाराशिव येथील रेणुका रक्तपेढी यांना सुपूर्द करण्यात आले असून ते गरजू रुग्णांच्या उपचारासाठी वापरण्यात येणार आहे.

याप्रसंगी भैरवनाथ शुगरचे कार्यकारी संचालक केशव सावंत, जिल्हा परिषद सदस्य विकी चव्हाण, माजी जिल्हा परिषद सदस्य उद्धव साळवी, नगरसेवक नागजी नाईकवाडे, वडजी गावचे सरपंच सुनील जाधवर, उपसरपंच कलम पठाण, बाळासाहेब मांगले, नितीन घुले, बबन कात्रे, विजय वाघमारे, योगीराज फरताडे, उद्धव घोलप, विठ्ठल चौधरी, बालाजी नकाते, पूजा उकरंडे, श्रीराम घुले तसेच तालुक्यातील शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नळदुर्ग-आलियाबाद परिसरात गारपीट; १६ एकर आंबा बागेचे मोठे नुकसान






**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१९ मार्च -**

नळदुर्ग व आलियाबाद शिवारात दि.१७ मार्च रोजी सायंकाळी ७ ते रात्री ९ या दरम्यान झालेल्या अवकाळी गारपिटीमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले. आलियाबाद येथील गट नं. २२ मधील मनीषा गुंडू पवार, गट नं. १७/१ मधील गुंडुरंगराव पवार व १७/२ मधील शांताबाई रंगराव पवार यांच्या सुमारे १६ एकर आंबा बागेचे नुकसान झाले आहे.

या बागेत साडेचार हजारांहून अधिक आंब्याची झाडे सेंद्रिय पद्धतीने जोपासली होती. मात्र अवघ्या दोन तासांच्या गारपिटीने संपूर्ण बाग उद्ध्वस्त झाली असून अंदाजे ५० ते ६० लाख रुपयांचे नुकसान झाल्याचे सांगण्यात येत आहे. मार्च अखेरीस विक्रीसाठी तयार असलेला आंबा पिक नष्ट झाल्याने शेतकऱ्यांवर मोठे आर्थिक संकट ओढवले आहे. यापूर्वीही सहा महिन्यांपूर्वी आलेल्या पुरात या शेतकऱ्यांची नदीकाठची आंबा, चिकू व पेरू बाग वाहून गेली होती. त्या संकटातून सावरत त्यांनी नव्याने उभी केलेली बाग गारपिटीने उद्ध्वस्त झाल्याने शेतकरी हताश झाले आहेत.

नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या मागणीनंतर कृषी सहाय्यक संतोष माने व नळदुर्गचे तलाठी वायचळ यांनी तात्काळ घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. शासनाने त्वरित मदत जाहीर करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी परिसरातील बागायतदारांनी केली आहे.

# पांढरेवाडी प्रकल्पातून पाणी सोडण्याची मागणी



**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.१९ मार्च -**

परंडा तालुक्यातील डोजा जि.प. मतदारसंघातील तांदुळवाडी, जगदाळवाडी व देऊळगाव ही गावे पांढरेवाडी प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात येतात.

दरवर्षी या गावांसाठी खैरी प्रकल्पातून पिण्याच्या व शेतीसाठी पाणी सोडले जाते. मात्र यंदा या गावांमध्ये तीव्र पाणीटंचाई निर्माण झाली आहे.

यामुळे पांढरेवाडी प्रकल्पातून खैरी नदी प्रवाहात तात्काळ पाणी सोडावे, अशी मागणी जिल्हा परिषद सदस्य भाऊसाहेब खरसडे यांनी तहसीलदारामार्फत जिल्हाधिकारी, धाराशिव यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

पाणी न सोडल्यास पिण्याच्या पाण्याबरोबरच शेतीपाण्याची टंचाई वाढून उभ्या पिकांना फटका बसण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे.

संबंधित अधिकाऱ्यांनी त्वरित आदेश देऊन गावांना दिलासा द्यावा, अशी मागणी शेतकरी बांधवांकडून करण्यात आली आहे.

या निवेदनाच्या प्रती तहसीलदार, परंडा तसेच कार्यकारी अभियंता, खैरी प्रकल्प, धाराशिव यांनाही देण्यात आल्या आहेत.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# छपरी रीलस्टारचा अतिरेक

## प्रॅन्क व्हिडीयोच्या माध्यमातुन सर्वसामान्यांना अपमानित करण्याच्या प्रकारात वाढ

**सुरेश काशिदे**
**नांदेड, दि. १९ मार्च-**
सोशल मीडियावर प्रसिद्धी मिळवण्यासाठी अनेक छपरी रीलस्टार प्रॅन्क व्हिडिओ बनवत आहेत. या व्हिडिओच्या माध्यमातून वृद्ध, सर्वसामान्य नागरिकांना अपमानित करुन त्यांना त्रास देत असुन हे प्रकार मोठ्या प्रमाणात वाढले आहेत. या छपरी रीलस्टार वर निर्बंध घालावेत व त्यांच्यावर कारवाई करावी अशी चर्चा सर्वसामान्य नागरीकांत होत आहे.

समाज माध्यम हे जन जागृतीची साधने असुन या माध्यमातुन अनेकांनी बेरोजगारीवर मात करत आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. तर दुसरीकडे प्रसिद्ध होण्यासाठी प्रँक रील बनवुन जनतेला त्रास देण्याच्य प्रकारातही वाढ झाली असुन लोकांना भीती दाखवुन, त्यांना त्रास देऊन व्हिडिओ बनवले जात आहेत. कंटेटच्या नावाखाली समोरच्या व्यक्तीला अपमानित करणे, त्यांना भीती दाखवण्याचे प्रकार वाढले आहेत, हातात बाहुली घेवुन भानामतीचे- जादूटोण्याचे व्हिडिओ बनवून लोकांना त्रास देणे, वृद्धांना मोठे होऊन काय होणार ? असे अजब प्रश्न विचारणे, समलैंगिक विवाहावर ग्रामिण भागातील वृद्धांच्या प्रतिक्रिया घेणे, वेड्याचे सोंग घेऊन लोकांना त्रास देणे, अल्पवयीन मुला- मुलींना अश्लील प्रश्न विचारून त्यांची प्रतिक्रिया घेणे असे प्रँक व्हिडिओ बनवण्याचे प्रकार नांदेड जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात वाढले असून हे छपरी रीलस्टार कुठलीही ठेवता बिनधास्तपणे लोकांना अपमानीत करुन त्रास देत आहेत.

त्यातच कुठलेही घटनेची शहानिशा न करता ती लगेचच समाज माध्यमावर व्हायरल करण्याच्या प्रकारातही वाढ होत असुन अशा या छपरी रीलस्टारांना जनता वैतागली असून त्यांना या रीलस्टारमुळे नाहक मानसिक त्रास सहन करावा लागत आहे. केवळ शहरातच नव्हे तर ग्रामिण भागातही अशा छपरी रीलस्टारची संख्या वाढत असुन अशा या प्रकारच्या प्रॅन्क ग्रील वर निर्बंध घालावे अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

# लोकचळवळीतूनच गावांचा कायापालट : स्वच्छता अभियानाला गती देण्यासाठी कर्मचाऱ्यांनी पुढाकार घ्यावा सीईओ मेघना कावली

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १९ मार्च-**
गावांचा सर्वांगीण विकास आणि शाश्वत स्वच्छता ही केवळ योजनांमधून नाही, तर लोकसहभागातूनच शक्य आहे. यासाठी कर्मचाऱ्यांनी पुढाकार घेऊन लोकचळवळ उभी करावी, असे प्रतिपादन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक मेघना कावली यांनी केले.

आज नांदेड येथे स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) टप्पा-२ अंतर्गत स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या जिल्हास्तरीय प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्घाटन त्यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी जलजीवन मिशनचे प्रकल्प संचालक तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी मयूरकुमार आंदेलवाड, नरेगा उपमुख्य कार्यकारी अधिकारी अमित राठोड, पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. सखाराम खुणे, डॉ प्रवीणकुमार घुले,अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष सूर्यवंशी, कार्यकारी अभियंता शिंदे, समाजकल्याण अधिकारी सत्येंद्र आऊलवार, मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्वीय सहाय्यक शुभम तेलेवार आदी उपस्थित होते.

स्वच्छता अभियानाला अधिक गती देण्यासाठी उजळणी प्रशिक्षण आवश्यक आहे. या प्रशिक्षणामुळे कर्मचारी प्रेरित होऊन प्रभावीपणे कामाला लागतील, असा विश्वास मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांनी व्यक्त केला.

प्रास्ताविकात उपमुख्य कार्यकारी अधिकारी मयूरकुमार आंदेलवाड म्हणाले, स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) टप्पा-२ हा अंतिम टप्प्यात असून या उपक्रमास एक वर्षाची मुदतवाढ देण्यात आली आहे. या कालावधीत सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापनाची सर्व कामे पूर्ण करून गावे शाश्वत करण्याचे आवाहन त्यांनी केले.

या प्रशिक्षणात विविध विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. उपमुख्य कार्यकारी अधिकारी अमित राठोड व क्षमता बांधणी तज्ज्ञ चैतन्य तांदूळकर यांनी स्वच्छता कामांची माहिती सादर केली. अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष सूर्यवंशी यांनी स्वच्छता कर्मचारी लसीकरण व आरोग्य विषयावर मार्गदर्शन केले. पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. सखाराम खुणे यांनी जनावरांच्या मलमूत्र व वैरण व्यवस्थापनावर मार्गदर्शन केले.

तसेच पाणी गुणवत्ता सल्लागार कपेंद्र देसाई यांनी जलप्रदूषण व स्वच्छता कर्मचाऱ्यांची भूमिका यावर सादरीकरण केले. अर्धापूर तालुक्यातील पिंपळगाव महादेव येथील ग्रामपंचायत अधिकारी एकनाथ कदम यांनी गावातील स्वच्छता उपक्रमांचा अनुभव कथन केला. या कार्यशाळेस तालुका स्तरावरील कनिष्ठ अभियंते, आरोग्य विस्तार अधिकारी, पंचायत विस्तार अधिकारी, जिल्हा पाणी व स्वच्छता कक्षातील अधिकारी तज्ञ व सल्लागार तसेच तालुका गट समन्वयक व समूह समन्वयक उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मिलिंद व्यवहारे यांनी तर उपस्थितांचे आभार सुशील मानवतकर यांनी मानले.

### शेतकऱ्यांच्या हक्काचा पिक विमा तात्काळ द्या, अन्यथा तीव्र आंदोलन : येसगे

**देगलूर** -ऑगस्ट-सप्टेंबर २०२५ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे नांदेड जिल्ह्यातील खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून, मुग, उडीद, सोयाबीन आणि तूर पिके अक्षरशः वाहून गेली. या पार्श्वभूमीवर शासनाकडून दुष्काळ मदत जाहीर करण्यात आली आणि काही प्रमाणात निधीही वितरित करण्यात आला. मात्र, पिक विम्याचा परतावा अद्याप शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झालेला नसल्याने संतापाची लाट उसळली आहे. यासंदर्भात शेतकरी नेते तथा काँग्रेस पक्षाचे नांदेड जिल्हा प्रवक्ते कैलास येसगे यांनी राज्याचे कृषी आयुक्त सूरज मांढरे तसेच संबंधित विभागाचे तंत्र अधिकारी सत्यजित शितोळे यांना निवेदन सादर केले आहे. निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची दखल घेत राज्य शासनाने पिक विमा परताव्याची घोषणा केली होती. विशेषतः देवेंद्र फडणवीस यांनी हेक्टरी १७ हजार रुपये पिक विमा देण्याचे जाहीर केले होते. मात्र, अनेक महिने उलटूनही शेतकऱ्यांना एक रुपयाही मिळालेला नाही, ही बाब गंभीर असल्याचे येसगे यांनी अधोरेखित केले. जिल्हास्तरावर वारंवार पाठपुरावा करूनही प्रशासनाकडून कोणतीही ठोस कार्यवाही होत नसल्यामुळे शेतकरी हवालदिल झाले आहेत. खरीप हंगामातील नुकसान भरून काढण्यासाठी विमा रक्कम अत्यावश्यक असताना विलंबामुळे शेतकऱ्यांच्या आर्थिक अडचणी अधिकच वाढत आहेत. दरम्यान, कृषी आयुक्तांनी या प्रकरणात तात्काळ हस्तक्षेप करून संबंधित विमा कंपनीला आदेश देत खरीप २०२५ चा पिक विमा लवकरात लवकर वितरित करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. अन्यथा शेतकऱ्यांना रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन छेडण्याशिवाय पर्याय उरणार नाही, असा इशारा कैलास येसगे यांनी निवेदनाद्वारे दिला आहे.

### आत्मनिर्भरेकडून महासत्तेकडे? विषयावर व्याख्यान

**नवीन नांदेड** -मराठी अर्थशास्त्र परिषद आणि स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे सामाजिक शास्त्रे संकुल यांच्या संयुक्त विद्यमाने विकसित भारत २०४७ : आत्मनिर्भरेकडून महासत्तेकडे? या विषयावर आयोजित पत्र पंडित पां.वा. गाडगीळ व्याख्यान संपन्न. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ येथील संकुलात घेण्यात आलेल्या व्याख्यान कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून विद्यापीठाचे माननीय प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन हे उपस्थित होते. अध्यक्षस्थानी मराठी अर्थशास्त्र परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा. डॉ. विकास सुकाळे हे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रमुख व्याख्याते म्हणून एस. एन. डी. टी. महिला विद्यापीठाचे प्रा. डॉ. सुभाष पाटील यांनी मार्गदर्शन केले त्यांनी भारताच्या स्वातंत्र्यापासून ते आज तागायत च्या प्रगतीचा आलेख उपस्थितांसमोर व्याख्यानाच्या स्वरूपात सादर केला. विकसित भारत होण्यातील अडचणी स्पष्ट करून भारत हा महासत्ता होऊ शकतो हे त्यांनी अधोरेखित केले. सदरील कार्यक्रमास कार्यवाह खजिनदार प्रा.डॉ. मारुती तेगमपुरे यांची देखील उपस्थिती होती. त्यांनी पां. वा. गाडगीळ यांच्या कार्याचा आढावा उपस्थितांसमोर सादर केला. व्याख्यानाच्या यशस्वीतेसाठी संकुलाचे संचालक प्रा.लोणारकर यांचे प्रयत्न मोलाचे होते तसेच या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा.नंदकुमार बोधगिरे यांनी केले. त्याच बरोबर सदरील व्याख्यानाच्या कार्यक्रमास प्रा शालिनी कदम, प्रा. बाबुराव जाधव, प्रा. संदीप जाधव, प्रा. गायकवाड. प्रा. भोशीकर,प्रा. पवळे , प्रा. नायर, प्रा. मठपती, , प्रा. सोळंके, प्रा.आदमाने आणि संकुलातील विद्यार्थी, संशोधक विद्यार्थी व इतर कर्मचारी मोठ्या प्रमाणात उपस्थिती होते. कार्यक्रमाची सांगता प्रा.शिवाजी गायकवाड यांच्या आभार प्रदर्शनांने झाली.

### श्री दत्त महाविद्यालयाची करिअर कट्टा उपक्रमात दैदिप्यमान कामगिरी

**नांदेड** -महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग व महाराष्ट्र राज्य माहिती व सहायता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणाऱ्या करिअर कट्टा या उपक्रमात श्री दत्त कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, हदगाव यांनी नांदेड विभागातून उल्लेखनीय कामगिरी करत विविध मानाचे पुरस्कार पटकावले आहेत. करिअर कट्टा अंतर्गत राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांमध्ये उत्कृष्ट नियोजन, विद्यार्थ्यांचा मोठा सहभाग व सातत्यपूर्ण उपक्रमांमुळे महाविद्यालयाला नांदेड विभागातून उत्कृष्ट महाविद्यालय म्हणून तृतीय क्रमांक प्राप्त झाला. तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिलीप काकडे यांना त्यांच्या प्रभावी नेतृत्व व मार्गदर्शनासाठी उत्कृष्ट प्राचार्य म्हणून प्रथम क्रमांकाचा मान मिळाला. याशिवाय करिअर कट्टा उपक्रमाचे तालुका पातळीवर प्रभावी समन्वय व यशस्वी अंमलबजावणी केल्याबद्दल प्रा. किशोर अनंत दवणे यांना उत्कृष्ट तालुका समन्वयक म्हणून प्रथम क्रमांक मिळाला आहे. या यशामुळे महाविद्यालयाच्या शैक्षणिक व सहशैक्षणिक कार्याला नवे अधोरेखित स्थान प्राप्त झाले आहे. पुरस्कार वितरण कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी प्रसिद्ध स्त्रीरोग तज्ज्ञ आणि सामाजिक कार्यकर्त्या डॉ. वृषालीताई किन्हाळकर होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र राज्य करिअर कट्टाचे मुख्य प्रवर्तक यशवंत शितोळे आणि भोकर विभागाचे पोलीस उपाधीक्षक हाके उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वीपणे घडून आणण्यासाठी डी.बी. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पंजाब चव्हाण, करियर कट्टा नांदेड विभागाचे विभागीय समन्वयक डॉ. सतीश चव्हाण यांनी विशेष परिश्रम घेतले. या सर्व यशस्वी कामगिरीबद्दल महाविद्यालय परिवाराने आनंद व्यक्त केला असून, या संपूर्ण कार्याचे श्रेय हदगाव तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष कृष्णा पाटील आष्टीकर आणि खासदार नागेश पाटील आष्टीकर यांच्या दूरदृष्टीपूर्ण मार्गदर्शन व सातत्यपूर्ण पाठबळाला दिले आहे. त्यांच्या प्रेरणेमुळेच महाविद्यालयात विविध शैक्षणिक व करिअरविषयक उपक्रम प्रभावीपणे राबविले जात असल्याचे महाविद्यालय प्रशासनाने सांगितले.या यशाबद्दल प्राचार्य डॉ. दिलीप काकडे, प्रा. किशोर दवणे तालुका समन्वयक, प्रा. एकनाथ पावडे महाविद्यालयीन समन्वयक करियर कट्टा, सर्व प्राध्यापक आणि कार्यालयीन कर्मचारी विद्यार्थ्यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

## बोरवाडीत आजपासून अखंड हरिनाम सप्ताहास सुरुवात

**तभा वृतसेवा**
**भोकर, दि. १९ मार्च-**



अखंड आंध समाजाचे आराध्य दैवत श्री गुरु रामबापू महाराज मेटकर यांच्या कृपाशीर्वादाने बोरवाडी येथे अखंड हरिनाम सप्ताहास गुरुवार १९ मार्च रोजी भक्तिभावपूर्ण वातावरणात प्रारंभ होत आहे. या पवित्र सप्ताहाची सुरुवात ह.भ.प. होनाजी महाराज साळावाडीकर यांच्या मंगलमय कीर्तनाने होणार असून संपूर्ण गाव हरिनामाच्या गजरात न्हाऊन निघणार आहे.

या सप्ताहादरम्यान दररोज नामस्मरण, भजन-कीर्तन व आध्यात्मिक प्रवचनांचा लाभ भाविकांना मिळणार आहे. ह.भ.प. प्रल्हाद महाराज वारकवाडीकर, ह.भ.प. दत्ता महाराज साळावाडीकर, ह.भ.प. कु. समृद्धी महाराज भिसे, ह.भ.प. गोविंद महाराज आमदरीकर, ह.भ.प. गजानन महाराज तामसेकर तसेच बोरवाडीचे सुपुत्र ह.भ.प. अशोक महाराज खंदारे हे आपल्या कीर्तनातून समाजप्रबोधन व अध्यात्मिक जागृती साधणार आहेत.

सप्ताहाची सांगता गुरुवार २६ मार्च रोजी ह.भ.प. रामदास महाराज मारझळेकर यांच्या काल्याच्या कीर्तनाने होणार असून, त्या दिवशी भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

या पवित्र उपक्रमासाठी आनंदराव वानोळे, शंकरराव बुलबुले व किसन महाराज बुरकुले यांच्या मार्गदर्शनाखाली तुकाराम महाराज खंदारे, शांताबाई बोतकर, भुराबाई ढोले, नामदेव महाराज वागतकर, यशवंतराव वानोळे, कोठुळे मानकरी तसेच ग्रामस्थ मोठ्या उत्साहाने परिश्रम घेत आहेत.

या भक्तिमय सप्ताहाचा लाभ घेऊन हरिनामाच्या गजरात सहभागी व्हावे, असे आवाहन समस्त बोरवाडी ग्रामस्थांनी भाविक भक्तांना केले आहे.

## नवोदयमध्ये सुरज अनगुलवारचा जिल्ह्यात तिसरा क्रमांक

**तभा वृतसेवा**
**हिमायतनगर, दि. १९ मार्च-**
तालुक्यातील मौजे सवना (ज.) येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेतील होतकरू विद्यार्थी सुरज देविदास अनगुलवार याने नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेत ९७.५० गुण मिळवत ग्रामीण भागातून जिल्ह्यात तिसरा क्रमांक पटकावला आहे. या यशामुळे शाळा, गाव व तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

या दैदिप्यमान यशाबद्दल सुरजचा त्यांच्या कुटुंबीयांसह हिमायतनगर येथील गटशिक्षणाधिकारी केशवराव मेकाले यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

अत्यंत साध्या परिस्थितीत शिक्षण घेत असतानाही सुरजने कष्ट, चिकाटी आणि जिद्दीच्या जोरावर हे यश संपादन केले. त्याच्या या यशामुळे सवना परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून सर्व स्तरांतून त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# शासकीय अन्नधान्य गोदामातील थेट वाहतूक करू नका : हमाल मापाडी

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १९ मार्च-**
शासनाने शासकीय अन्नधान्य गोदामातील धान्याची वाहतूक दोन टप्पे वगळून थेट करण्याचा निर्णय घेतला आहे, या पद्धतीच्या वाहतुकीच्या निर्णयामुळे हमाल मापाडी हातगाडा संघटनेतील कामगारांच्या हाताचे काम बंद होईल, त्यामुळे पूर्वीप्रमाणेच दोन टप्प्यात काम चालू ठेवावे, या मागणीचे निवेदन राज्याचे अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाचे प्रधान सचिव यांच्याकडे नांदेड हमाल मापाडी हातगाडा संघाच्या वतीने पाठविण्यात आले आहे.

हमाल मापाडी हातगाडा संघटनेतील कामगार खूप वर्षांपासून याच गोदामात काम करून पूर्ण परिवाराचा उदरनिर्वाह चालवत आहेत. परंतु शासनाच्या या निर्णयामुळे त्यांच्यावर उपासमारीची वेळ येईल. नांदेड जिल्ह्यात २४० ते ३०० कामगार आजघडीला काम करतात. त्यामुळे त्यांच्यासह त्यांच्या परिवारातील सदस्यांना या निर्णयाचा फटका बसून उपासमारीची वेळ येणार आहे. शासनाच्या नियमातच आजपर्यंत कामगार काम करत आले आहेत, परंतु शासनाचे काही कर्मचाऱ्यांच्या मर्जीने चालावे लागते त्यामुळे हेच लोक त्यांच्या बचावासाठी आमच्या कामगारांची बदनामी करतात आणि स्वतः वेगळे राहातात. तसेच शासनाच्या टेंडरमध्ये टप्पा १ व टप्पा २ वाहतुकीच्या दरात फरकच नाही. असे असताना कामगारांचे काम अचानक बंद झाल्यामुळे हे कामगार व त्यांचे कुटुंब जगणार कसे हा प्रश्न निर्माण होत आहे.

त्यामुळे शासनाने पूर्वीप्रमाणेच कामाचे स्वरूप ठेवून हमाल मापाडी हातगाडा संघटनेतील कामगारांना न्याय द्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. अन्यथा धरणे आंदोलन, उपोषणाचा मार्ग अवलंबवावा लागेल, असा इशारा हमाल मापाडी हातगाडा संघटनेचे अध्यक्ष रावसाहेब कांबळे, शिवाजी दराडे, मंगलसिंह परमार, देवीदास पल्लेवाड, गंगाधर नरवाडे व सर्व पदाधिकारी यांनी दिला आहे.

या निवेदनाच्या प्रती राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, वित्ततीय सल्लागार व उपसचिव, विभागीय आयुक्त पुरवठा विभाग, उपायुक्त, कक्ष अधिकारी, कामगार आयुक्त, जिल्हा पुरवठा अधिकारी, पोलीस अधीक्षक, तहसीलदार आणि अध्यक्ष/सचिव नांदेड माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ यांना देण्यात आल्या आहेत.

## सगरोळीत रविवारी 'ज्ञानमहर्षी' बाबासाहेब देशमुख यांच्या पुतळ्याचे अनावरण

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १९ मार्च-**
ग्रामीण महाराष्ट्राच्या मातीत शिक्षणाचे बीज पेरून हजारो विद्यार्थ्यांचे आयुष्य उजळवणाऱ्या तसेच ग्रामीण भागातील शिक्षणाची गंगा घराघरात पोहोचवण्यासाठी आपले संपूर्ण आयुष्य समर्पित करणाऱ्या कर्मयोगी बाबासाहेब देशमुख यांच्या जन्मशताब्दी वर्षाचा ऐतिहासिक समारोप सोहळा येत्या दि.२२ मार्च रोजी सकाळी १०:३० वाजता सगरोळी येथील शारदानगर येथे संपन्न होणार आहे. या सोहळ्यात बाबासाहेबांच्या उत्तुंग कार्याची साक्ष देणाऱ्या पूर्णकृती पुतळ्याचे अनावरण आणि त्यांच्या जीवनगौरवावर आधारित स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात येणार आहे.

संस्कृती संवर्धन मंडळाच्या माध्यमातून १९५९ पासून सगरोळी सारख्या ग्रामीण भागात शिक्षण, कृषी आणि सामाजिक उत्थानाची भक्कम परंपरा बाबासाहेब देशमुख यांनी निर्माण केली. त्यांचे कार्य केवळ एका संस्थेपुरते मर्यादित नसून ते ग्रामीण विकासाचे एक मॉडेल ठरले आहे. त्यांच्या या महान कार्याप्रती कृतज्ञता म्हणून वर्षभर विविध शैक्षणिक आणि प्रेरणादायी उपक्रम राबविण्यात आले. ज्याचा समारोप या भव्य सोहळ्याने होत आहे. या सोहळ्यासाठी मान्यवरांची मांदियाळी सगरोळीत अवतरणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माणिकप्रभू संस्थान (जि. बिदर) चे श्री. सद्गुरू ज्ञानराज माणिकप्रभू महाराज उपस्थित राहणार असून, त्यांच्या आशीर्वादाने सोहळ्याची शोभा वाढणार आहे. तर प्रमुख वक्ते म्हणून देशाचे नामवंत अर्थतज्ज्ञ, माजी कुलगुरू तथा माजी राज्यसभा सदस्य डॉ नरेंद्र जाधव हे उपस्थितांना मार्गदर्शन करणार आहेत. त्यांच्या वैचारिक मांडणीतून बाबासाहेबांच्या कार्याचा वारसा नव्या पिढीसमोर उलगडला जाणार आहे.

या सोहळ्यात बाबासाहेबांच्या कार्याचा आढावा घेणाऱ्या विशेष स्मरणिकेचे प्रकाशन ही एक महत्त्वाची घटना असणार आहे. 'बाबासाहेबांचे कार्य हे येणाऱ्या अनेक पिढ्यांसाठी दीपस्तंभ आहे. त्यामुळे हा सोहळा केवळ एक औपचारिक कार्यक्रम नसून तो विचारांचा उत्सव आहे. असे मत संयोजन समितीने व्यक्त केले आहे.

# युवा नेते संदेश केराम यांच्या हस्ते राष्ट्रीय विजेत्या विद्यार्थ्यांचा गौरव

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १९ मार्च-**
तालुक्यातील विद्यार्थ्यांनी आदिवासी संस्कृतीची शान असलेल्या पारंपरिक दंडार नृत्याच्या जोरावर राष्ट्रीय पातळीवर उल्लेखनीय यश संपादन केले आहे. सत्यभामा युनिव्हर्सिटी, चेन्नई येथे आयोजित ऑल इंडिया स्पर्धेत किनवट तालुका येथील विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांक पटकावत तालुक्याचे नाव देशभर उज्ज्वल केले.



या दैदिप्यमान यशानंतर विद्यार्थ्यांचा सत्कार लोकप्रिय आमदार भीमरावजी केराम यांचे चिरंजीव तथा युवा नेते संदेश केराम यांच्या हस्ते उत्साहात पार पडला. आपल्या प्रेरणादायी नेतृत्वातून आणि सातत्यपूर्ण पाठबळातून ग्रामीण व आदिवासी भागातील तरुणांना प्रोत्साहन देणारे संदेश केराम यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करत त्यांच्या यशाला किनवटच्या मातीतल्या कलेचा राष्ट्रीय सन्मान असे गौरवोद्गार काढले.

यावेळी संदीप कोडापे, रितेश मडावी, पियुष तोडसाम, शुभम कोडापे, पुरुषोत्तम आत्राम, गजानन आत्राम, प्रथमेश आत्राम, संकेत जुगनाके आणि लखन कनाके या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

एकेकाळी उपेक्षित राहिलेल्या दंडार नृत्याला आज राष्ट्रीय स्तरावर मान्यता मिळत असल्याचा अभिमान व्यक्त होत आहे. किनवटच्या ग्रामीण मातीत जपला गेलेला हा पारंपरिक नृत्यप्रकार आता देशभर पोहोचला असून, तो आंतरराष्ट्रीय स्तरावर नेण्याचा संकल्प व्यक्त करण्यात आला.

याप्रसंगी संदेश केराम यांनी संपूर्ण टीमचे मनापासून अभिनंदन करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. ग्रामीण व आदिवासी प्रतिभेला योग्य व्यासपीठ मिळवून देणे ही आपली जबाबदारी आहे, असे सांगत भविष्यात संघाला आवश्यक ती सर्व मदत करण्याची ग्वाहीही त्यांनी दिली.

किनवट तालुक्यातील या यशामुळे सर्व स्तरांतून विद्यार्थ्यांवर अभिनंदनाचा वर्षाव होत असून तालुका परिसरात आनंदाचे वातावरण आहे. आदिवासी कला व संस्कृतीला मिळालेल्या या राष्ट्रीय सन्मानाबद्दल समाधान व्यक्त केले जात आहे.

# ग्रामीण भागातील झोका संस्कृती लयास जाण्याच्या मार्गावर

## अंगणातील झोका हरवतोय; ग्रामीण संस्कृती लयास जाण्याच्या उंबरठ्यावर

**तभा वृतसेवा**
**देगलूर, दि. १९ मार्च-**
गुढीपाडवा हा सण ग्रामीण भागात आजही मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. घरासमोर उभारली जाणारी गुढी ही विजय, समृद्धी आणि नव्या आशेचे प्रतीक मानली जाते. तसेच आंबा, लिंबाच्या झाडाचे फुले, खोबर, हरभऱ्याची दाळ आणि गुळ यापासून बनवलेले 'पन्नर' पदार्थ आरोग्याचे मुलमंत्र देते. तर घरांच्या अंगणात, शेताच्या बांधावर किंवा मोठ्या झाडांच्या फांद्यांना मजबूत दोऱ्याने बांधूलेले झोके प्रगती व नवउत्साहाचे प्रतिक मानले जाते. ग्रामीण भागातील ही 'झोका संस्कृती' सध्या लयास जाण्याच्या मार्गावर आहे.

गुढीपाडवा हा सण अत्यंत श्रद्धा व उत्साहाचा समजल जातो. या दिवशी बांबूवर रेशमी वस्त्र, कडुलिंब-आंब्याची पाने, साखरेच्या गाठी आणि तांब्याचा लोटा लावून उभारलेली गुढी ही घरात सुख, समृद्धी, आरोग्य आणि सकारात्मकता उर्जेचे प्रतीक मानली जाते. त्यामुळे गुढी उभारण्याची परंपरा आजही टिकून आहे. हा दिवस भगवान रामांच्या अयोध्येत पुनरागमनाचा विजय, तसेच शालिवाहनाच्या पराक्रमाची आठवण म्हणून गुढी उभारण्याची परंपरा असल्याचे सांगितले जाते. तसेच या सणानिमित्त झाडाला झोके बांधून मोठ्या उत्साहात गुढीपाडव्याच्या निमित्ताने घरांच्या अंगणात, शेताच्या बांधावर किंवा



मोठ्या झाडांच्या फांद्यांना मजबूत दोऱ्या बांधून झोके उभारले जाते. लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वजण झोक्याचा आनंद घ्यायचे, नव्या वर्षाचे स्वागत मोठ्या उत्साहात करीत असत. झोका हा केवळ करमणुकीचे साधन नाही, तर तो ग्रामीण जीवनातील आनंद, एकोप्याची भावना आणि सामूहिक उत्सवाचे जिवंत प्रतीक आहे. मात्र, याच गुढीपाडव्याच्या उत्सवाला एकेकाळी चारचाँद लावणारी 'झोका संस्कृती' आता हळूहळू लयास जात असल्याचे चित्र दिसून येत आहे.

बदलत्या काळानुसार या झोका संस्कृतीवरही सावट आले आहे. आजही गुढी उभारली जाते, पूजा-अर्चा होते; पण अंगणातील झोका हा हळूहळू दुर्मिळ होतआहे. यांचे प्रमुख कारण म्हणजे वाढता डिजिटल तंत्रज्ञानाचा प्रभाव होय. स्मार्टफोन, सोशल मीडिया आणि ऑनलाइन मनोरंजनामुळे ग्रामीण भागातील मुलांचे आणि तरुणांचे आयुष्य बदलत आहे. पूर्वी अंगणात खेळणारी पिढी आता मोबाइलच्या स्क्रीनवर तासनतास वेळ घालवतात परिणामी, सर्वांना आनंद देणारी झोका बांधण्याची संस्कृती हळूहळू लयास जाताना दिसत आहे. पुर्वी प्रत्येक घरात सामुदायिकरित्या झोका खेळण्याची प्रथा होती. आज झोका हरवण्याच्या मार्गावर आहे. झोक्याची संस्कृती टिकवण्यासाठी

डिजिटल युगातही झोका महोत्सव, पारंपरिक खेळ स्पर्धा यांसारखे उपक्रम राबविल्यास नव्या पिढीला या 'झोका संस्कृती' जोडता येईल.

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## मराठी नववर्षाची सुरुवात झाली अवकाळीच्या सावटाखाली

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १९ मार्च :** गुरुवारी मराठी नववर्ष अर्थात गुढी पाडवा उत्साही वातावरणात साजरा करण्यात आला. हवामान विभागाच्या अंदाजाप्रमाणे आजही वातावरणावर अवकाळी पावसाचे सावट असल्याने नववर्षाची सुरुवातच अवकाळीच्या सावटाखाली झाल्याचे पाहावयास मिळाले.

यावर्षी अगदी फेब्रुवारीच्या अखेरपासूनच उन्हाळ्याच्या तीव्रतेची चाहूल लागली होती. त्यावरून उन्हाळा मागच्या वर्षीच्या तुलनेत कडक राहणार असल्याचे संकेत मिळाले होते. मार्चच्या पहिल्या आठवड्यातही उन्हाची असह्य तीव्रता अनुभवायला आली. त्यातच हवामान विभागाने मार्चच्या तिसऱ्या आठवड्यात अवकाळी पाऊस आणि जोरदार वाऱ्याचा अंदाज वर्तवला होता. हा अंदाज राज्याच्या अनेक भागात तंतोतंत उतरला. लातूर जिल्ह्यातही मागच्या चार दिवसात अनेक ठिकाणी गारपीट झाली. अवकाळी पाऊस आणि जोरदार वाऱ्याने पिकांसह आंब्याचेही अतोनात नुकसान केले. हे वा-तावरण आणखी चार दिवस राहण्याची शक्यता वर्तवली जात आहे. अवकाळीने शेतकऱ्यांचे खूप नुकसान केले आहे. अजूनही त्यात वाढ होण्याची चिन्हे एकंदर परिस्थितीवरून दिसत आहेत, गुरुवारी गुढी पाडवा सर्वत्र उत्साहात साजरा झाला असला तरी त्यावर लातूर जिल्ह्यात अवकाळीचे सावट दिसून आले.



## लातूर जिपच्या अध्यक्षा उषाताई पाटील यांचे मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडून अभिनंदन



**लातूर :** महाराष्ट्राचे मुख्यमंत्री ना. देवेंद्रजी फडणवीस यांनी लातूर जिल्हा परिषदेच्या नवनिर्वाचित अध्यक्षा सौ. उषाताई संभाजी पाटील तळेगावकर यांचे अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या यावेळी जिल्ह्याचे पालकमंत्री ना. शिवेंद्रसिंह राजे भोसले, भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड आणि अरविंद पाटील निलंगेकर यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

यावेळी मुख्यमंत्री ना. देवेंद्रजी फडणवीस यांनी आगामी पाच वर्षात जिल्हा परिषदेच्या माध्यमातून ग्रामीण भागाचा कायापालट करण्यासाठी आणि सर्वांगीण विकासाची गंगा घराघरांत पोहोचवण्यासाठी अनमोल सूचना केल्या.

मुंबई येथील या सदिच्छा भेटीप्रसंगी पालकमंत्री ना. शिवेंद्रसिंहराजे भोसले, भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड, अरविंद पाटील निलंगेकर, जिपचे गटनेते रामचंद्र तिरुके, संभाजी पाटील तळेगावकर, नगरसेवक शहाजी पाटील तळेगावकर, भरत चामले आणि कु. भक्ती तळेगावकर यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

## शिक्षण उपसंचालक दीपक चवणे यांचे स्वागत



**लातूर :** विभागीय शिक्षण उपसंचालकपदी दीपक चवणे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. चवणे यांनी नुकताच पदभार स्वीकारला असता लातूर जिल्हा संस्थाचालक संघटनेच्यावतीने फेटा, शाल व पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले.

विभागीय शिक्षण उपसंचालक डॉ. दत्तात्रय मठपती यांनी नुकतीच स्वेच्छानिवृत्ती घेतली आहे. राज्य शासनाच्या शिक्षण विभागाने या रिक्त पदावर राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे येथील दीपक चवणे यांची नियुक्ती केली आहे. चवणे यांनी पदभार स्वीकारला असता त्यांच्या सुविद्य पत्नी हिंगोली 'डायट'च्या प्राचार्या जयश्री चवणे यांच्यासह त्यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापक संघटनेचे माजी राज्य अध्यक्ष वसंतराव पाटील, संस्थाचालक संघटनेचे अध्यक्ष रामदास पवार, सचिव बाबूराव जाधव, कोषाध्यक्ष प्राचार्य डी. एन. केंद्रे, प्रा. गोविंदराव घार, कालिदास माने, पी. एन. बंडगर, जे. जी. सगरे, मुख्याध्यापक संघटनेचे अध्यक्ष प्रकाश देशमुख, सचिव बी. जी. चोले आदी उपस्थित होते.

## लातूर जि .प.चे ३७.७८ कोटींचे शिलकी अंदाजपत्रक

**लातूर :** लातूर जिल्हा परिषदेने स्वसंपादीत उत्पन्न व खर्चाचे (२०२५-२६) सुधारित व २०२६-२७ च्या मूळ अंदाजपत्रकास मान्यता देताना ३७ कोटी ७८ लाख ६१ हजार रूपये खर्चाचे शिल्लकी अंदाजपत्रक जाहीर केले. सेस फंडातील ५५ कोटी ६२ लाख ८३ हजार १३३ रूपये रक्कमेच्या जमाधारित अर्थसंकल्पास गुरूवारी (दि.१२) जि. प. त सीईओ, विभाग प्रमुखांच्या उपस्थितीत चर्चा करून वर्षभरात केल्या जाणाऱ्या खर्चाचा ताळेबंद जाहीर केला,

जिल्ह्यात राहणाऱ्या एकल महिलांसाठी २० लाख तर मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या वेगवेगळ्या प्रशिक्षणास हातभार म्हणून ४० लाख रूपयांची नव्याने जि. प.च्या अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आली आहे. जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या स्वसंपादीत उत्पन्न व खर्च, तसेच पाणी पुरवठा, देखभाल व दुरूस्ती, घसारा निधी, पंचायत समिती उप कराचे अंदाजपत्रक दरवर्षी २७ मार्चपूर्वी सभागृहासमोर सादर करून मंजूर करणे बंधनकारक असल्याने शिल्लकी अंदाजपत्रक जाहीर केले. उत्पन्नाच्या ६१ टक्के म्हणजे ७कोटी ३३ लाख १ हजार रूपयांची तरतूदी ह्या घटनात्मक दृष्टीने कायम ठेवण्यात आल्या.

लातूर जिल्हा परिषदेत नूतन पदाधिकाऱ्यांनी १६ मार्च रोजी अधिकृत पाऊल ठेवले. या पदाधिकाऱ्यांना मानधन, सादिल, प्रवास भत्ता, बैठक खर्च, इंधन, फोन, फर्निचर इत्यादी सोयी-सुविधा पुरवाव्या लागतात. त्यासाठी दोन कोटी ९२ लाख सहा हजार रूपयांचा निधी उपलब्ध केला. गेल्या ४ वर्षांपासून पदाधिकारी नसल्याने त्यांच्या खर्चाची तरतूद करण्याची गरज भासली नाही. पण आता पदाधिकारी आल्याने तरतूद करणे बंधनकारक झाले.राज्य सरकारने वेगवेगळ्या योजनांचा निधी देताना व्हर्च्यूव्हल पर्सनल डिपॉझिट अकौंटची (व्हीपीडीए) कल्पना आणल्याने जि. प. कडे येणारा पैसा थांबला, सप्टेंबर २०२४ पासून हा व्हीपीडीएची सुरू झाली आणि जि. प. ला योजनेच्या पैशातून मिळणारे व्याज थांबले. २०२४-२५ मध्ये २२ कोटी व्याज मिळायचे. २०२५-२६ साली १२ कोटी तर २०२६-२७ मध्ये तर मिळणारे व्याज ७ कोटींवरच आले. पुढच्या वर्षी हा आकडा आणखी कमी होणार आहे. परिणामी, जि. प. च्या स्व उत्पन्नावर गदा आली.

# लातूरच्या गोलाईत उभारली सार्वजनिक गुढी

### महापौर जयश्री सोनकांबळे, पोलिस अधिक्षक अमोल तांबे, जि.प. सीईओ राहूलकुमार मीना, मनपा आयुक्त सौ.मानसी मीना यांच्या हस्ते मानाच्या गुढीचे पूजन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १९ मार्च :**

लातूरच्या गंजगोलाईतील जगदंबा मंदिरासमोर गुढी पाडव्याच्या दिवशी गुरुवार १९ मार्च रोजी सकाळी ९.३० वाजता परंपरेप्रमाणे प्रथम मानाच्या सार्वजनिक गुढीचे मान्यवरांच्या हस्ते पूजन करून गोलाई भोवती गुढीची मिरवणूक काढत मंदिरासमोर सार्वजनिक गुढी उभारण्यात आली.

येत्या वर्षभरासाठी विविध सामाजीक उपक्रमांचा संकल्प करत प्लॅस्टीकमुक्ती सोबत वृक्ष संवर्धन, स्वच्छता अभियान आणि पाणी बचतीबाबत जनजागृती संदेश देण्यात आला. तसेच झाडे लावा झाडे जगवा-चा संदेश देण्यात आला.

प्रारंभी लातूरच्या प्रथम नागरिक महापौर सौ. जयश्री सोनकांबळे, पोलिस अधिक्षक अमोल तांबे, जि.प. मुख्य कार्यकारी अधिकारी राहूलकुमार मीना, मनपा आयुक्त सौ. मानसी मीना, मनपा क्षेत्रीय अधिकारी समाधान सुर्यवंशी, गंजगोलाईचे नगरसेवक गिरीश ब्याळे, गणेश गवारे, सौ.अग्रवाल, यांच्या हस्ते प्रथम मानाच्या सार्वजनिक गुढीचे पूजन करण्यात आले.

मान्यवरांचे स्वागत संस्थापक अध्यक्ष पंकज जैस्वाल, यंदाच्या महोत्सवाचे अध्यक्ष विकास कांबळे, स्वागताध्यक्ष अमोल गिते, अप्पू भरडे, बालाजी गवळी, विष्णू भुतडा, नितिन पडिले, रामभाऊ जवळगे, नवनाथ भोसले, बालाजी पारसेवार, विद्याताई काळे, डी.व्ही. काळे, प्रभाकर चव्हाण, वामन पाठक, रवि जाधव, संदीप येरावार, सचिन गांगले आदिंनी केले.

तत्पूर्वी सार्वजनिक गुढी महोत्सवाचे संस्थापक अध्यक्ष पंकज जैस्वाल व गतवर्षीचे अध्यक्ष रामभाऊ जवळगे यांच्या हस्ते यंदाचे महोत्सवाचे अध्यक्ष विकास कांबळे आणि स्वागताध्यक्ष अमोल गिते यांच्याकडे यंदाच्या गुढी महोत्सवासाठीचा पदभार सुपूर्द करण्यात आला. त्यानंतर परंपरेप्रमाणे मान्यवरांच्या हस्ते गुढीचे पूजन करून ढोल ताशांच्या गजरात संपूर्ण गंजगोलाई भोवती जंगी मिरवणूक काढण्यात आली.

मिरवणूकी नंतर मान्यवरांच्या हस्ते विविध क्षेत्रात उल्लेखनिय कार्य केलेल्या व्यक्तीचा प्रशस्तीपत्र देवून मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. यावेळी मान्यवरांची भाषणे झाली.

प्रस्ताविक पतंजलीचे प्रमूख योगशिक्षक विष्णू भूतडा यांनी केले. मनोगत संस्थापक अध्यक्ष पंकज जैस्वाल यांनी केले. गुढी महोत्सवाचे अध्यक्ष विकास कांबळे यांनी वर्षभरातील विविध संकल्प सांगितले. तर स्वागताध्यक्ष अमोल गिते यांनी वृक्ष चळवळीचे महत्व सांगीतले. सुत्र संचलन सारीका डांगे व कलशेट्टी यांनी केले. पुरस्काराचे मानकरी डॉ. भास्करराव रामराव पाटील, शरद केशवराव झरे, आमचं ग्रीन लातूर वृक्ष फाउंडेशन, महावितरणचे राहूल गाडे, आर टू आर फाउंडेशनचे राहूल पाटील, माझ लातूर परिवाराचे सक्रिय सदस्य महेबूब उर्फ बाबा शेख, आरोग्यदूत



उद्धव तेलंगे, सर्पमित्र भिमाशंकर गाढवे, योगशिक्षक प्राचार्या सुस्मिता सगरे, प्राचार्या विद्या काळे, डी.व्ही. काळे, डॉ. विजय अजनीकर, सर्फराज सय्यद, अँड. आर बी लोंढे, उद्योजक शिरीष जैन व आशिष जैन, डॉ. बी. सी. घाटे, गोविंद राजे, संतोष धाराशिवकर, पत्रकार विनोद कांबळे, लिंबराज पन्हाळकर, सचिन अंकुलगे, रामभाऊ जवळगे, धनराज माने, रशीद तांबोळी, दिनेश कबाडे आदीना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

विविध सामाजीक संदेश

सार्वजनिक गुढी पाडवा महोत्सवाच्या अनुषंगाने पर्यावरण पूरक उपक्रमांचे संदेश देण्यात आले. स्वच्छता संदेश, पाणी बचतीचे महत्व, वृक्ष संवर्धनाचा संदेश, वाहतूक नियमाचे पालन, शिस्तीचे महत्व या बाबत पत्रक वितरीत करून पर्यावरणपूरक जनजागृती करण्यात आली.

प्रारंभी जगदंबा मंदिरातील देवीची अभिषेक पूजा विश्र्वस्त शिवशंकर पारशेट्टी दाम्पत्य, काळे दाम्पत्यांच्या हस्ते करण्यात आली. यावेळी नारायण भूतडा, किशोर जैन, प्रभाकर शिरूरे, काकासाहेब घुटे, प्रकाश शिदे, दिनेश कबाडे आदिंचिही उपस्थिती होती.

## गारपिटीने झालेल्या नुकसानीचे पंचनामे करून शेतकऱ्यांना मदत द्या : आ. देशमुख



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १९ मार्च :** लातूर, धाराशिव जिल्ह्यांसह मराठवाड्यातील अनेक ठिकाणी झालेल्या वादळी वारा, पाऊस आणि गारपिटमुळे शेतीचे प्रचंड नुकसान झाले आहे. या नैसर्गिक आपत्तीमुळे फळबागा, भाजीपाला आणि रब्बी पिके उद्धवस्त झाली असून, प्रशासनाने नुकसानीचे तातडीने पंचनामे करून शासनाने नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना भरपाई जाहीर करावी, अशी मागणी राज्याचे माजी मंत्री आ. अमित विलासराव देशमुख यांनी केली आहे.

आ. अमित देशमुख यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, या अगोदर २२ फेब्रुवारी २०२६ रोजी लातूर जिल्ह्यात अनेक ठिकाणी अवकाळी पाऊस झाला होता, ज्यातून रब्बी पिके कशीबशी वाचली होती. मात्र, दि. १७ मार्च रोजी पुन्हा झालेल्या गारपिटमुळे हाताशी आलेली पिके पूर्णतः जमीनदोस्त झाली आहेत. यामध्ये प्रामुख्याने काढणीला आलेली ज्वारी, गहू, हरभरा आणि करडई या पिकांचा समावेश आहे. तसेच आंबा, द्राक्ष बागा आणि भाजीपाल्याचीही मोठी नासाडी झाली आहे. शासनाने या गंभीर परिस्थितीची दखल घेऊन प्रशासनाला तात्काळ पंचनाम्यांचे आदेश द्यावेत आणि शेतकऱ्यांना ठोस दिलासा द्यावा.

हवामान खात्याच्या अंदाजानुसार २०- २१ मार्चपर्यंत विदर्भ आणि मराठवाड्यात पुन्हा अवकाळी पाऊस व गारपीट होण्याची शक्यता आहे. या पार्श्र्वभूमीवर प्रशासनाने शेतकरी वर्गामध्ये व्यापक जनजागृती करावी, जेणेकरून संभाव्य नुकसान टाळण्यासाठी शेतकरी पूर्वतयारी करू शकतील, असेही आ.अमित देशमुख यांनी प्रशासनाला सुचवले आहे.

## जिद्द आणि चिकाटीतून यशाला गवसणी - डॉ. प्रितम भाले



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १९ मार्च :** यशस्वी होण्याची जिद्द आणि चिकाटीमुळे यशाला गवसणी घालू शकलो असे प्रतिपादन डॉ. प्रितमकुमार भाले यांनी व्यक्त केले. युपीएससीत यश संपादन केल्याबद्दल आयोजित सत्कार प्रसंगी ते बोलत होते. यावेळी नूतन नगरसेवक भीमाशंकर बेंबळकर, नगरसेविका रागिणी यादव, बाबुराव भाले, धर्मेंद्र चौहान यांची प्रमुख उपस्थिती होती.

भारतीय लोकसेवा आयोग परीक्षा उत्तीर्ण झाल्याबद्दल विक्रम नगरातील श्रावस्ती बुद्ध विहार या ठिकाणी विक्रम नगर वासियांच्या वतीने डॉ. प्रितमकुमार यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी ते बोलत होते.

पुढे बोलताना डॉ. भाले म्हणाले की बालपणापासून घरात छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराचा वारसा, समाजासाठी कांहीतरी करण्याची इच्छा होती. ती उच्च शिक्षणाशिवाय पूर्ण करू शकत नाही याची जाणीव झाली. घरातील वडीलधाऱ्या मंडळीच्या सहकार्याने शिक्षण घेऊन आज भारतीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत उत्तीर्ण होऊ शकलो. यश मिळू शकते, त्यासाठी सातत्य आणि परिश्रम महत्वाचे आहे. मुलांनी वेळेचा अपव्यय टाळून आम्हाला भगवान गौतम बुद्ध आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितलेल्या यशस्वी मार्गाचा अवलंब करावा अशा भावना व्यक्त केल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक प्रा. विलास घारगावकर तर आभार रागिणी यादव यांनी मानले. यावेळी यावेळी रमेश सरवदे,राहुल कांबळे, यशपाल कांबळे,शुभम कांबळे,कुसुमताई बानाटे, ज्योतीताई घारगावकर,डॉ. वैभवी कांबळे, विजया सरवदे,टिकू माने यांच्यासह परिसरातील नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते.

## श्री केशवराज माध्यमिक विद्यालयात दहावी प्रविष्ट विद्यार्थ्यांचा पालक मेळावा संपन्न

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १९ मार्च :** येथील श्री केशवराज माध्यमिक विद्यालयात दि.१७ मार्च २०२६ मंगळवार रोजी शैक्षणिक वर्ष २०२६ - २०२७ मध्ये इयत्ता दहावीत प्रवेश करणाऱ्या विद्यार्थ्यांचा पालक मेळावा संपन्न झाला. याप्रसंगी मंचावर मेळाव्याचे अध्यक्ष तथा केशवराज माध्यमिक विद्यालयाच्या शालेय समितीचे अध्यक्ष गंगाधर खेडकर, केंद्रीय कार्यकारिणी सदस्य संजय गुरव, शिक्षक-पालक संघाच्या अध्यक्षा दुर्गा गोविंदपूरकर, विद्यालयाचे मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे, केंद्रीय विद्यासभा संयोजक तथा उपमुख्याध्यापक महेश कस्तुरे, दहावी विभागप्रमुख रमेश चव्हाण यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती माता व भारत माता यांच्या प्रतिमा पूजनाने करण्यात आली.

याप्रसंगी विद्यालयाचे मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे यांनी आपल्या मनोगतात निवडक विद्यार्थी, अभ्यासात कमी गती असणारे विद्यार्थी आणि मध्यम प्रकारचे विद्यार्थी या सर्वांबाबतचे वर्षभराचे नियोजन सांगितले. पालकांनी आपल्या पल्यांना मोबाईलपासून दूर ठेवावे, वाईट संगतीपासून दूर ठेवावे, मुलांचे आरोग्य सांभाळावे, वारंवार शिक्षकांची भेट घ्यावी, दररोज शाळेत उपस्थित राहील, याची खबरदारी घ्यावी असे सांगितले. शिक्षकांची मेहनत, विद्यार्थ्यांचे परिश्रम व पालकांनी घेतलेली काळजी यावरच विद्यार्थ्याचे यश अवलंबून असते, असे सांगून सर्व पालकांच्या सहकार्याची अपेक्षा व्यक्त केली.

अध्यक्षीय समारोपात शालेय समितीचे अध्यक्ष गंगाधर खेडकर यांनी विद्यार्थ्यांच्या जीवनाला दिशा देणारे, वळण देणारे वर्ष म्हणजे दहावीचे वर्ष होय असे सांगितले. पालकांनी आपल्या पाल्यांबाबत सजग राहावे; पण अतिरिक्त अपेक्षा लादू नयेत, त्यांच्या रुचीनुसार त्यांना घडवावे. घरातील वातावरण तणावमुक्त ठेवावे, असे आवाहन करून दहावीत प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांना, त्यांच्या पालकांना आगामी शैक्षणिक वर्षासाठी शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी दहावी विभाग प्रमुख रमेश चव्हाण यांनी दहावीचे वार्षिक नियोजन, सायंकालीन ज्यादा तास, घटक चाचण्या, सराव परीक्षा, पालक संपर्क, समुपदेशन या वर्षभर घेण्यात येणाऱ्या उपक्रमांचे नियोजन सांगितले. यानंतर विषयश: शिक्षकांनी मार्गदर्शन केले. यात भाषा विषयाचे मार्गदर्शन विलास झाटे, गणित व विज्ञान विषयाचे मार्गदर्शन आदिनाथ कदम, सामाजिक शास्त्र विषयाचे मार्गदर्शन सुनीता बनसोडे यांनी केले. याप्रसंगी प्रातिनिधीक स्वरूपात बापूराव पवार व सुदेशना मुळे या पालकांनी आपले मनोगत व्यक्त केले. त्यांनी दहावी विभागाकडून घेण्यात येणाऱ्या उपक्रमांचे कौतुक करुन, विद्यालयाकडून काही अपेक्षाही व्यक्त केल्या. या पालक मेळाव्यास मोठ्या संख्येने पालकांची उपस्थिती होती. या पालक मेळाव्याचे प्रास्ताविक, परिचय व स्वागत दहावी विभाग सहप्रमुख अनुपमा पाटील यांनी केले. सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन तेजस्विनी सांजेकर यांनी केले तर शैला कुलकर्णी यांच्या कल्याण मंत्राने कार्यक्रमाची सांगता झाली. दहावी विभागांतर्गत संपन्न झालेल्या या मेळाव्याच्या यशस्वीतेसाठी विद्यालयाचे मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे, केंद्रीय विद्यासभा संयोजक तथा उपमुख्याध्यापक महेश कस्तुरे, पर्यवेक्षक राजश्री कुलकर्णी, इंदू ठाकूर, धनंजय कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली दहावी विभाग प्रमुख रमेश चव्हाण, सहप्रमुख अनुपमा पाटील तसेच व्यवस्थेतील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# एमआयटी लातूर येथे 'विश्वमैदान २०२६' आंतर महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धांचे आयोजन

### विविध खेळांनी रंगणार विश्वमैदान क्रीडा महोत्सव; प्रा. तेजस कराड यांची माहिती

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १९ मार्च :** युवकांमध्ये क्रीडावृत्ती, नेतृत्वगुण आणि संघभावना विकसित करण्याच्या उद्देशाने माईर एमआयटी शिक्षण संस्था समूहाच्या पुढाकारातून दि. २२ मार्च ते ३ एप्रिल २०२६ या कालावधीत "विश्वमैदान २०२६" या भव्य आंतर महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे.

या क्रीडा महोत्सवामागे माईर एमआयटी शिक्षण संस्था समूहाचे संस्थापक विश्वधर्मी प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड यांची प्रेरणादायी संकल्पना असून एमआयटी शिक्षण संस्था समूह, लातूरचे कार्यकारी संचालक डॉ. हनुमंत कराड यांच्या मार्गदर्शनाखाली या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे.

"एकच आव्हान, जिंकूया मैदान!" या घोषवाक्याखाली आयोजित करण्यात आलेल्या या क्रीडा स्पर्धेत विविध वैद्यकीय महाविद्यालयांतील उत्कृष्ट खेळाडूंना एकत्र येऊन आपल्या कौशल्याचे प्रदर्शन करण्याची संधी मिळणार आहे. विश्वमैदान २०२६ हा केवळ क्रीडा स्पर्धांचा कार्यक्रम नसून युवकांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी एक महत्त्वाचे व्यासपीठ ठरणार आहे. स्पर्धात्मक वातावरणातही खेळाडूवृत्ती, शिस्त आणि बंधुभाव जपण्याचा संदेश या उपक्रमातून दिला जाणार आहे.

या क्रीडा स्पर्धेत बाह्य (आउटडोअर), अंतर्गत (इनडोअर) आणि ॲथलेटिक्स अशा विविध क्रीडा प्रकारांचा समावेश करण्यात आला आहे. आउटडोअर प्रकारांमध्ये व्हॉलीबॉल (मुले), थ्रोबॉल (मुली), फुटबॉल (मुले), क्रिकेट (मुले व मुली), खो-खो तसेच कबड्डी या स्पर्धा आयोजित करण्यात येणार आहेत. इनडोअर खेळांमध्ये टेबल टेनिस, कॅरम, बुद्धिबळ आणि बॅडमिंटन या स्पर्धांचा समावेश आहे. तर ॲथलेटिक्स प्रकारात १०० मीटर व २०० मीटर धावणे, ४१०० मीटर रिले, डिस्कस थ्रो, जेव्हलिन थ्रो, शॉटपुट आणि लाँग जंप या स्पर्धा होणार आहेत.

या स्पर्धेची सुरुवात दि. २२ मार्च २०२६ रोजी होणार आहे. दि. २२ मार्च ते २९ मार्च या कालावधीत लीग आणि नॉकआउट सामने खेळवले जाणार आहेत. दि. ३० मार्च २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता उद्घाटन




प्रा. तेजस कराड

समारंभ पार पडणार आहे. त्यानंतर दि. ३० मार्च ते ३ एप्रिल या कालावधीत उपांत्य आणि अंतिम सामने खेळवले जातील. स्पर्धेचा समारोप समारंभ दि. ३ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता होणार आहे.

या स्पर्धेत विविध वैद्यकीय महाविद्यालयांमधील ६८५ पेक्षा अधिक खेळाडू सहभागी होणार आहेत. प्रत्येक महाविद्यालयातून केवळ सर्वोत्तम संघ किंवा सर्वोत्तम खेळाडूला प्रतिनिधित्व करण्याची संधी दिली जाणार आहे. स्पर्धेत सर्वाधिक गुण मिळवणाऱ्या संस्थेला जनरल चॅम्पियनशिप ट्रॉफी प्रदान करण्यात येणार आहे.

आजच्या डिजिटल युगात युवकांना प्रत्यक्ष क्रीडांगणाशी जोडण्याचा आणि त्यांच्यात सकारात्मक स्पर्धेची भावना निर्माण करण्याचा उद्देश या उपक्रमामागे आहे. "वसुधैव कुटुंबकम्" या तत्त्वावर आधारित बंधुभाव आणि जागतिक शांततेचा संदेशही या क्रीडा महोत्सवातून दिला जाणार आहे. त्यामुळे 'विश्वमैदान २०२६' हा क्रीडा स्पर्धांसोबतच युवकांच्या सर्वांगीण विकासाचा महत्त्वपूर्ण सोहळा ठरणार असल्याची माहिती माईर एमआयटी शिक्षण संस्था समूहाचे संचालक प्रा. तेजस हनुमंत कराड यांनी दिली.

# केज तालुक्यातील काही भागात गारपीट शेती पिकाचे खूप मोठ्या प्रमाणात नुकसान






केज : दिनांक १९मार्च रोजी केज तालुक्यामधील तुकोचीवाडी येथे गारपीट होऊन आंबा पिकाचे खूप मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे तसेच तालुक्यातील वेगवेगळ्या ठिकाणी गारपीट होऊन ज्वारी आंबा फळ पिके पालेभाजे चे खूप मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे तरी लवकरात लवकर प्रशासनाने पंचनामे करून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्यावी बळीराजाला सरकारचे मदतीची अपेक्षा आहे

## पंकजा मुंडे यांनी रामटेक निवासस्थानी गुढी उभारुन केले मराठी नववर्षाचे स्वागत

### जनतेच्या सुख - समृध्दी अन् सुरक्षेसाठी केली प्रार्थना



**तभा. वृत्तसेवा**

मुंबई दि. १९ .....राज्याच्या पशुसंवर्धन व पर्यावरण मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या रामटेक या शासकीय निवासस्थानी आज गुढी पाडवा सण उत्साहात साजरा झाला. ना. पंकजाताईंनी गुढी उभारून मराठी नव-वर्षाचे उत्साहात स्वागत केले. पाडव्याच्या शुभेच्छा देतानाच त्यांनी राज्यातील व देशातील जनतेच्या सुख-समृध्दी आणि सुरक्षेसाठी ईश्वराकडे प्रार्थना केली.

चैत्र मासारंभ अर्थात मराठी नवीन वर्षाचा आजचा पहिला दिवस, सर्वत्र गुढी पाडवा म्हणून उत्साहात साजरा झाला. ना. पंकजाताई मुंडे यांनी रामटेक या शासकीय निवासस्थानी विधीवत पूजनाने चैतन्य अन् मांगल्याची गुढी उभारून मराठी नववर्षाचे स्वागत केले.

जनतेच्या सुरक्षा अन् प्रगतीसाठी केली प्रार्थना...! गुढी पाडव्यानिमित्त जनतेला शुभेच्छा देताना त्या म्हणाल्या, 'महाराष्ट्रातील सर्व जनतेला खास करून माझ्या लाडक्या बहिणींना हे वर्ष सुख-समृध्दी, आनंदाचं, समाधानचं आणि उत्तम आरोग्याचं जावो. जगामध्ये आज जे काही चाललंय ते पाहिल्यानंतर मी देवीच्या चरणी,देवाच्या चरणी हीच प्रार्थना करते की, हे वर्ष माझ्या महाराष्ट्राला, माझ्या भारत देशाला सुख-समृध्दी व सुरक्षिततेचे जावो. प्रत्येक नागरिक हा सुरक्षित राहो, समृध्द राहो आणि माझ्या देशाने जगदगुरू होण्याच्या वाटचालीकडे जलदगतीने प्रवास करावा' अशा शब्दांत ना. पंकजाताईंनी नागरिकांना पाडव्याच्या शुभकामना व्यक्त केल्या.

# माजी आमदारांच्या पतीसह चेअरमन-लिपिक अडचणीत

**तभा. वृत्तसेवा**

**बीड |** लोकनेते गोपीनाथराव मुंडे मागासवर्गीय सहकारी सूतगिरणी, केज येथील तत्कालीन चेअरमन आणि लिपिक विरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल झाल्याने एकच खळबळ उडाली आहे. माहिती अधिकारातून विद्यार्थ्यांचे व शासकीय कर्मचाऱ्यांचे जात पडताळणी प्रमाणपत्र हस्तगत करून त्याचा गैरवापर केल्याचा गंभीर आरोप या प्रकरणात करण्यात आला आहे. विशेष म्हणजे दोन महिन्यांपूर्वीच याच प्रकरणात औरंगाबाद खंडपीठाने संबंधिताना क्लीन चिट दिली असताना पोलिस अधिकाऱ्यांनी हा गुन्हा दाखल केला आहे.

यावाबत अंकुशनगर, बीड येथील सामाजिक कार्यकर्ते अनिल कचरू तुरुकमारे यांनी केज पोलिस ठाण्यात दिलेल्या तक्रारीनुसार, त्यांचा मुलगा ऋषिकेश तुरुकमारे याचे जात पडताळणी प्रमाणपत्र २०१७ मध्ये जिल्हा जात पडताळणी समिती, बीड यांच्याकडून निर्गमित झाले होते. दरम्यान, माहिती अधिकाराच्या माध्यमातून जानेवारी ते मार्च २०१७ या कालावधीत विविध कारणांसाठी सादर झालेल्या अर्जदारांची जात वैधता प्रमाणपत्रे मागविण्यात आली होती. त्यानुसार सूतगिरणीचे तत्कालीन लिपिक राजकुमार दयाराम वाव्हळे यांनी माहिती अधिकारातून ऋषिकेश तुरुकमारे याच्यासह तब्बल ४६४ जणांची जात वैधता प्रमाणपत्रे मिळविल्याचा आरोप आहे.

त्यानंतर सूतगिरणीचे तत्कालीन चेअरमन विजयप्रकाश किसनराव ठोंबरे आणि लिपिक वाव्हळे यांनी संगनमताने संबंधित व्यक्तींची संमती न घेता त्यांना सूतगिरणीचे सभासद दाखवून यादी प्रादेशिक उपआयुक्त, वस्त्रोद्योग, संभाजीनगर कार्यालयाकडे सादर केल्याचे तक्रारीत नमूद आहे. ही बाब लक्षात आल्यानंतर तक्रारदाराने संबंधित कार्यालयात धाव घेतली. त्यानंतर वादग्रस्त सभासद यादी रद्द करण्यात आल्याचेही समोर आले आहे.

मात्र, परवानगीशिवाय वैयक्तिक कागदपत्रांचा वापर करून फसवणूक केल्याचा ठपका ठेवत केज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हा गुन्हा दाखल करताना पोलिस अधिकारी यांनी कुठलीही पार्श्वभूमी न जाणून घेता दबावात हा गुन्हा दाखल करून घेतल्याचा आता आरोप होत आहे.

या प्रकरणी तपास पोलिस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्यासह इतर अधिकाऱ्यांच्या विरोधात शासनाकडे कारवाई करण्याची मागणी माजी आमदार संगीता ठोंबरे यांनी दैनिक पुढारीशी बोलताना केली आहे. दरम्यान, या गुन्ह्यात माजी आमदार संगीता ठोंबरे यांचे पती विजयप्रकाश ठोंबरे यांचे नाव समोर आल्याने राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले असताना दुसरीकडे मात्र थेट फसवणुकीचा गुन्हा दाखल झाल्याने या प्रकरणाला नवे वळण मिळाले आहे. राजकीय संरक्षण मिळणार की कायद्याचा बडगा बसणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### राजकारणाचे कवच की कारवाईचा फास ?

लोकनेते गोपीनाथराव मुंडे सहकारी सूतगिरणी स्थापनेपासूनच विविध वादाच्या भोवऱ्यात अडकलेली आहे. या पार्श्वभूमीवर माजी आमदार संगीता ठोंबरे यांनी अलीकडेच शिवसेनेत प्रवेश केला होता. सूतगिरणी प्रकरणी संभाव्य कारवाई टाळण्यासाठी हा राजकीय निर्णय घेतल्याची चर्चा रंगली होती.

### संगीता ठोंबरे यांची भूमिका

"उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दोन महिन्यांपूर्वीच या प्रकरणात आम्हाला क्लीन चिट दिली आहे. संबंधित व्यक्तीचे नाव सूतगिरणीच्या सभासद यादीत कुठेही नाही. केवळ विरोधाचे राजकारण करण्याच्या हेतुने हा गुन्हा नोंदविण्यात आला आहे. या प्रकरणी संबंधित पोलिस अधिकाऱ्यांच्या भूमिकेबाबत आम्ही शासनाकडे दाद मागणार आहोत," अशी प्रतिक्रिया माजी आमदार संगीता ठोंबरे यांनी दिली.

# परळीतील जळीत कांड : घर जळाले नाही तर मुलानंच जाळलं

**तभा. वृत्तसेवा**

**बीड |** बीडच्या परळी शहरात दोन दिवसांपूर्वी एका सराफ व्यापाऱ्याच्या घराला लागलेली आग प्रकरणी धक्कादायक माहिती समोर आली आहे. शहरातील विद्यानगर या ठिकाणी सराफा व्यापाऱ्याच्या कौटुंबिक वादातून मुलानेच घर पेटवून दिले बापानेच परळी शहर पोलिस स्टेशनमध्ये पाच जणांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. पोटच्या मुलानेच स्वतःचं घर पेटवून दिल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, परळी येथील सराफा व्यापारी अरुण टाक यांचे परळी येथील विद्यानगर येथील राहते घर दोन दिवसांपूर्वी रात्रीच्या सुमारास अचानक आग लागली होती. या लागलेल्या आगीत त्याचा दोन मजली बंगाल जळून खाक झाला होता. मात्र, या घरातील लोक दुसरीकडे गेले असल्यामुळे जीवितहानी टळली होती. या घटनेमुळे परळी शहरात मोठी खळबळ उडाली होती. परिसरातील नागरिकांनी आग विझवण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केला होते. तब्बल दोन तास हा बंगला जळत होता. अग्निशमन दलाच्या मदतीने या आगीवर नियंत्रण मिळवण्यात यश आले होते. नेमकी आग कशामुळे लागली यावर पोलिस प्रशासनाच्या वतीने तपास करण्यात येत होता. मात्र, ही आग लागली नसून ती लावण्यात आली होती, अशी धक्कादायक माहिती समोर आली आहे.

परळी जळीतकांडाला आता आता नवीन खळबळजनक खुलासा समोर आला आहे. चक्क घरातील मुलानेच कौटुंबिक वादातून स्वतःचे घर जाळले असल्याचे फिर्यादीत व्यापारी अरुण टाक यांनी म्हटले आहे. या प्रकरणी परळी येथील शहर पोलिस स्टेशनमध्ये आरोपी मुलाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेमुळे उर्चेला उधाण आले आहे.

डिझेल ओतून पेटवले घर

आरोपी मुलाने त्याच्या मित्रांच्या मदतीने डिझेल ओतून घर पेटवून दिल्याचे अरुण टाक यांनी पोलिसांत दिलेल्या तक्रारीत म्हटलं आहे. हा सर्व प्रकार कोणत्याही बाहेरच्याने केलेला नसून कौटुंबिक वादातून झाल्याचे समोर येत आहे पुढील तपास परळी शहर पोलिस करत असल्याचे सांगण्यात आले आहे.

## वारकरी भजनी मंडळ अध्यक्षपदी सुरेश जोशी आणि उपाध्यक्षपदी देविदास डोळे



**तभा. वृत्तसेवा**

**बीड(प्रतिनिधी) दि.१७ |** ३/२०२६ मंगळवार रोजी सर्व सन्माननीय सदस्य श्री रुक्मिणीकांत कृपा वारकरी संप्रदाय मंडळ, संत नामदेव नगर पूर्व धानोरा रोड, बीड यांची वारकरी मंडळाचे संस्थापक अध्यक्ष श्री प्रभाकरराव कुलकर्णी नवगण राजुरीकर गुरुजी यांच्या अध्यक्षतेखाली व मंडळाचे कार्यरत अध्यक्ष श्री कमलाकरराव मालेगावकर यांच्या घरी बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीची सुरुवात हरिपाठाने झाली. त्यानंतर मागील दोन वर्षाचा अहवाल श्री कमलाकर मालेगावकर यांनी मांडला. नवीन संवत्सर आरंभी मंडळाचे नूतन अध्यक्ष म्हणून श्री सुरेशराव जोशी पारगावकर यांचे नाव मंडळाचे संस्थापक अध्यक्ष श्री प्रभाकरराव कुलकर्णी यांनी सुचविले तसेच उपाध्यक्ष व कोषाध्यक्ष म्हणून श्री देविदास डोळे यांचे नाव सुचविले. सर्वानुमते दोघांनाही सर्वांनी टाळ्या वाजवून अनुमोदन दिले,आणि पुढील कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी नूतन अध्यक्ष श्री सुरेश जोशी यांचा श्री कमलाकर मालेगावकर यांनी तसेच नूतन उपाध्यक्ष तथा कोषाध्यक्ष श्री देविदास डोळे यांचा श्री बाळासाहेब पारगावकर यांच्या शुभ हस्ते पुष्पहाराने स्वागत करण्यात आले.

बैठकीसाठी उपस्थित सदस्यातून मासिक वारीचे नियोजन चिठ्ठ्या टाकून करण्यात आले. सर्व वारकरी मंडळ सदस्यांनी पंढरपूर वारी करून सर्वांना प्रसाद वाटप करावा असे ठरले.वारीचे नियोजन पुढील प्रमाणे करण्यात आले. चैत्र - श्री कमलाकर मालेगावकर , वैशाख- श्री प्रभाकरराव कुलकर्णी आणि प्रा. डी.एस. कुलकर्णी , ज्येष्ठ-श्री आर.डी. देशमुख , अधिक ज्येष्ठ-श्री हरिभाऊ बुगदे, आषाढ- श्री दादासाहेब जोशी खडकीकर , श्रावण- श्री देविदास डोळे

# व्यापक बैठकीचे आयोजन; जय श्रीराम!" च्या नाऱ्याने बीड शहर भगव्या रंगात न्हाऊ द्या!

**तभा. वृत्तसेवा**

**बीड – प्रतिनिधी |** हिंदूंचे आराध्य दैवत प्रभू श्रीराम यांच्या जन्मोत्सवानिमित्त बीड शहर पुन्हा एकदा भगव्या उत्साहाने दुमदुमणार आहे! प्रतिवर्षीप्रमाणे यंदाही भव्य दिव्य शोभायात्रा आणि विराट मोटारसायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले असून, संपूर्ण शहरात रामनामाचा जयघोष घुमणार आहे.

गेल्या महिनाभरापासून शहरातील विविध भागांत महाआरतीच्या माध्यमातून रामभक्तांना एकत्र आणण्याचे कार्य जोरात सुरू आहे. आता या ऐतिहासिक सोहळ्याच्या तयारीचा अंतिम टप्पा गाठला असून, उद्या गुरुवार, दिनांक १९ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ७ वाजता पेठ बीड येथील श्री बालाजी मंदिरात निर्णायक महासभेचे आयोजन करण्यात आले आहे.

ही केवळ बैठक नाही, तर रामभक्तांच्या शक्तीचे प्रदर्शन आहे!

बीड शहरातील प्रत्येक हिंदू बांधवाने, प्रत्येक रामभक्ताने या महासभेला हजेरी लावून आपली उपस्थिती नोंदवावी आणि रामकार्याच्या तयारीत स्वतःला झोकून द्यावे, असे ठाम आवाहन आयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून बीड शहरातील श्री राम जन्मोत्सव हा केवळ उत्सव नसून हिंदू एकतेचे भव्य प्रतीक बनला आहे. शिस्त, भव्यता आणि एकजूट यामुळे या सोहळ्याची दखल राज्यासह देशभरात घेतली जाते – ही प्रत्येक बीडकरासाठी अभिमानाची गोष्ट आहे!

यंदा २६ मार्च २०२६ रोजी होणारा हा जन्मोत्सव ऐतिहासिक ठरणार आहे, बजरंगी ढोल ताशा पथक, जिवंत देखावे व अन्य विविध आकर्षणे यांनी परिपूर्ण ही शोभायात्रा असणार आहे, या पार्श्वभूमीवर सर्व हिंदू बांधवांनी उत्सवाच्या तयारीत सक्रिय सहभाग नोंदवून रामकार्याला हातभार लावावा, असे आवाहन समितीने केले आहे.

# मृतांना जिवंत कामगार ठरविणाऱ्या 'बीड पॅटर्न'ची चौकशी

### सुरेश धस, नमिता मुंदडा यांनी लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून बीडमधील मृतांना जिवंत करण्याचा नवा पॅटर्न सभागृहाच्या निदर्शनास आणला.



**मुंबई |**मृत व्यकींना जिवंत दाखवून, त्यांना बांधकाम कामगार ठरवून लाखो रुपयांची मजूरी घेतल्यानंतर पुन्हा याच कामगारांचा अपघाती मृत्यू दाखवून नुकसान भरपाईपोटी लाखो रुपये उकळण्याच्या 'बीड पॅटर्न'ची सखोल चौकशी करुन दोषींवर कठोर कारवाई करण्याची ग्वाही कामगारमंत्री आकाश फुंडकर यांनी मंगळवारी विधानसभेत दिली.

सुरेश धस, नमिता मुंदडा यांनी लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून बीडमधील मृतांना जिवंत करण्याचा नवा पॅटर्न सभागृहाच्या निदर्शनास आणला. बीड जिल्हा इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळांतर्गत मार्च २०२० ते फेब्रुवारी २०२६ या कालावधीत शेकडो मृतांना बोगस बांधकाम कामगार दाखवून कोट्यावधी रुपयांचा अपहार करण्यात आला. जिल्ह्यामध्ये शंभराहून अधिक प्रकरणांमध्ये दहा वर्षांपूर्वी मृत झालेल्याना बांधकाम कामगार म्हणून नोंद करण्यात आले, त्यांना कामाच्या रकमा अदा करण्यात आल्या आणि पुन्हा त्यांना नवीन मृत्यूचा दाखलाही देण्यात आला. अनेकांनी परदेशात देखील काम केल्याची नोंद अशा प्रकरणात करण्यात आली आहे अशी माहिती सुरेश धस यांनी यावेळी दिली. काही प्रकरणात तर या कामगारांचा कामावर असताना मृत्यू झाल्याचे दाखवून कायदेशीर वारसास मिळणारे पाच लाख रुपयेही हडप करण्यात आल्याचे धस यांनी सांगितले.

कामगारमंत्री फुंडकर यांनीही अशाप्रकारचा घोटाळा झाल्याची कबुली देत आता बांधकाम कामगारांची सर्व प्रक्रिया ऑनलाईन करण्यात आल्याचे सांगितले. विभागाने राज्यभरात दक्षता पथकांच्या माध्यमातून ४६ ठिकाणी गुन्हे दाखल केले आहेत, बीड प्रकरणातही स्वतंत्र अधिकाऱ्यामार्फत सखोल चौकशी करण्यात येईल. तसेच, उपलब्ध पुरावे सादर करण्याचे आवाहन करत, दोषींवर शंभर टक्के कारवाई करण्यात येईल, अशी ग्वाही फुंडकर यांनी दिली.

राज्यात काही ठिकाणी बोगस एजंटांकडून बनावट कागदपत्रे आणि खोटे सही-शिक्के तयार करून सरकारी योजनांचा गैरफायदा घेतला जात असल्याचेही त्यांनी नमूद केले. अशा प्रकारांना कोणतीही सहानुभूती दाखवली जाणार नसून दोषी अधिकारी, संबंधित संस्था किंवा इतर कुणीही असले तरी त्यांच्यावर कठोर कारवाई केली जाईल असेही त्यांनी स्पष्ट केले. पूर्वी कामगार नोंदणी प्रक्रिया ऑफलाइन असल्यामुळे अशा गैरप्रकारांना वाव होता. ही त्रुटी दूर करण्यासाठी नोंदणी प्रक्रिया पूर्णपणे ऑनलाइन करण्यात आली असून त्यात बायोमेट्रिक प्रणालीचा समावेश करण्यात आला आहे, ज्यामुळे फसवणूक रोखण्यास मदत होणार आहे.

बीड जिह्यात २०२० ते २०२६ या कालावधीत ११५ अर्ज प्राप्त झाले होते. त्यापैकी एक अपघाती मृत्यूचा अर्ज खरा आढळला असून उर्वरित ११४ अर्जांची तपासणी सुरू असल्याची माहितीही त्यांनी दिली.

## स्वा. सावरकर प्राथमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांची ऑलम्पियाडच्या राज्यस्तरीय स्पर्धेत नेत्रदीपक कामगिरी



**तभा. वृत्तसेवा**

**बीड |** येथील भारतीय शिक्षण प्रसारक संस्था अंबाजोगाई संचलित स्वा सावरकर प्राथमिक विद्यालयात ऑलम्पियाडच्या राज्यस्तरीय स्पर्धेत पहिली ते सातवीच्या एकुण ९६ विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्यासह अंतिम फेरीत प्रवेश मिळवला होता. फेब्रुवारी २०२६ मध्ये झालेल्या राज्यस्तरीय अंतिम फेरीचा निकाल जाहीर करण्यात आला आहे.

यामध्ये इयत्ता तिसरीची कु. आराध्या अमोल धस (४ था क्रमांक), इयत्ता सातवीची कु. सिद्धी शिवकुमार वालुरकर (१३ वा क्रमांक), इयत्ता चौथीची कु. तृणाली बिभीषण थोरात (१७ वा क्रमांक) यांनी राज्यस्तरीय गुणवत्ता यादीत स्थान मिळवत शिष्यवृत्ती तसेच मेडल मिळवले आहे.

या नेत्रदीपक कामगिरी बद्दल संस्थेचे मुख्य प्रशासकीय अधिकारी तथा प्राचार्य मा.श्री. चंद्रकांतजी मुळे, विद्यासभा उपाध्यक्ष तथा केंद्रीय कार्यकारिणी सदस्य मा.श्री. ऊमेशजी जगताप, स्वा सावरकर प्राथमिक विद्यालयाच्या शालेय समितीचे अध्यक्ष मा.श्री.सतिशजी कुलकर्णी, उपक्रमशील मुख्याध्यापिका श्रीमती बालिकाताई देशमुख, स्पर्धा परीक्षा प्रमुख श्री शरद भवर व श्रीमती पल्लवी खंबायते, सर्व वर्ग शिक्षक यांनी कौतुक केले आहे.

टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड. मल्टी-स्टेट शेड्युल्ड बँक
Bharose ka Bank Bhavishya ka Bank
दूरदृष्टीची गुंतवणूक, सुरक्षित आणि मजबूत भविष्याची खात्री.
13 महिन्यांची विशेष मुदत ठेव योजना, मर्यादित कालावधीसाठी.
ज्येष्ठ नागरिकांसाठी वार्षिक व्याजदर
7.60%*
इतर ग्राहकांसाठी वार्षिक व्याजदर
7.35%*
ऑफर मर्यादित कालावधीसाठी
*अटी व नियम लागू.
www.tjsb.bank.in | ✆ : 022 48897222